

# श्री साईबाबा जन्मस्थान मंदिर, पाथरी मार्गदर्शिका



संकलन व संपादन

वि.बा.खेर

# श्री साईबाबा
# जन्मस्थान मंदिर, पाथरी
# मार्गदर्शिका

: संकलन व संपादन :
वि. वा. खेर

श्री साईबाबा जन्मस्थान मंदिर, पाथरी – मार्गदर्शिका

प्रकाशक :
दि. वा. चौधरी
व्यवस्थापकीय विश्वस्त,
श्री साई स्मारक समिती, पाथरी
पाथरी - ४३१ ५०६,
जिल्हा परभणी, महाराष्ट्र.

मुद्रक :
सुंदरम आर्ट प्रिंटिंग प्रेस
वडाळा उद्योग भवन,
मुंबई - ४०० ०३१.

प्रथम आवृत्ती : विजया दशमी, २००१
द्वितीय आवृत्ती : ९ जानेवारी, २००३
तृतीय आवृत्ती : २१ मार्च, २००४
चतुर्थ आवृत्ती : १४ जानेवारी, २००८

मूल्य : रु.१८/-

## अंतरंग

प्रास्ताविक

श्री साईबाबांच्या जन्मस्थानाचा शोध
– वि. बा. खेर १

पाथरी साई जन्मस्थान मंदिराची
स्थापना : महत्त्वाचे टप्पे २०

स्वामी साईशरणानंद : अल्प परिचय २३

श्री बल्लबाबा : अल्प परिचय ३४

पाथरी साई जन्मस्थान मंदिरामार्फत साजरे
होणारे वार्षिक उत्सव ३७

श्री साईबाबा अष्टोत्तरशतनामावलिः ३८

नामस्मरणाचे महत्त्व ४९

# प्रास्ताविक

''समर्थ रामदास स्वामींनी अगदी यथार्थ शब्दात वर्णन केलेले आहे : 'विश्रांती वाटते तेथे जावया पुण्य पाहिजे ।।' या गोष्टीचा अनुभव जीवनात भाविक आणि विवेकी दोघांनाही येत असतो. फक्त ती दृष्टी असावी लागते. असाच आगळा अनुभव दत्तकृपेने आला. ही माहिती अभ्यासक, संशोधक आणि भाविक व जिज्ञासू यांच्या दृष्टीने पण फार महत्त्वाची ठरावी.''

''थोर अवतारी पुरुष साईबाबा यांच्याबद्दल विपुल साहित्य अनेक भक्तांनी लिहिलेले आहे; पण त्यांच्या कुळ-गोत्राबद्दल आणि मूळ स्थान व त्यांची जन्मभूमी याबद्दल आजपर्यंत अधिकृत काही नोंद आढळत नव्हती. याबद्दल अनेक गोष्टी कथनात येत होत्या. गेल्या २५ वर्षांपासून श्री. विश्वासराव खेर हे याबद्दल सतत संशोधन करीत होते. सातत्याने या गोष्टीचा पाठपुरावा करण्यास त्यांनी खूप कष्ट घेतले. सतत प्रवास आणि गाठीभेटी घेणे व उपलब्ध पुराव्याची छाननी करण्यात त्यांनी कधी कंटाळा केला नाही. या त्यांच्या प्रयत्नास शेवटी यश आले.''

''भूतपूर्व हैदराबाद निजाम राजवटीचा मराठवाडा भाग आज महाराष्ट्र प्रदेशात मोडतो. मराठवाडा ही संतांची भूमी आहे. त्या परिसराच्या परंपरेस साजेल असाच हा इतिहास आहे. गोदावरीच्या पवित्र काठावरचीच ही पुण्यभूमी आहे. वासुदेवानंद सरस्वती शिष्य योगानंद सरस्वती (ऊर्फ गांडा महाराज) यांचे क्षेत्र गुंज या दत्तकृपेचाच हा भाग आहे. परभणी जिल्ह्यात पाथरी नावाचे तालुक्याचे गाव आहे. या पाथरीचा उल्लेख प्राचीन काळात पार्थपूर वा पार्थग्राम असा आढळतो. या पाथरी गावातच एका भुसारी उपनाव असलेल्या ब्राह्मण कुटुंबात साईबाबा यांचा जन्म झाला. यांचे मूळ नाव हरी असे होते.''

''पाथरी येथे या घराण्याचे घर असलेली वास्तू जमीनदोस्त झाली होती. वाडा पडीक होता. काही अवशेष दिसत होते.[१]''

ही जागा विश्वास खेर व दिनकरराव चौधरी यांनी जून १९७८ मध्ये प्रोफेसर भुसारी यांच्याकडून ''श्री साई स्मारक समिती, पाथरी'' स्थापून त्या संस्थेचे नावे विकत घेतली व खरेदीखताची १.६.१९७८ ला सेलू येथील सबरजिस्ट्रारच्या कचेरीत नोंदणी झाली.

''मुंबईचे आर्किटेक्ट सुभाष दळी यांच्या कल्पक आराखड्या-नुसार या जन्मस्थानाच्या प्राचीन वास्तुच्या जागेत नवी संगमरवरी मंदिराची इमारत आज उभी आहे.[२]'' मंदिराचा गाभारा जुन्या काळच्या वाळतिणीच्या खोलीचे मूळ जागी वरती उभारला आहे. त्यात साईबाबा यांची साडेपाच फूट उंचीची पंचधातूची मूर्ती आहे. मूर्ती अप्रतिम आहे.

''या नवीन वास्तुचा आराखडा तयार करताना अभिनव योजना आखलेली आहे. या घराण्याच्या पुरातन वास्तुतील काही शेष भाग होता तो भाग या मंदिराच्या तळघरात बंदिस्त करून सुरक्षित ठेवलेला आहे. यात जुनी दगडमातीची इमारत असून हा भाग बाळंतखोली व अन्य भागाचा आहे. या उत्खननात लाभलेली पूजेची उपकरणे व एक मारुतीची मूर्ती आणि मातीची घागर इत्यादी वस्तू त्याच भागात एका ठिकाणी व्यवस्थित ठेवल्या आहेत. प्राचीन वास्तुबरोबरच या सर्व गोष्टी भाविकांना सहज पाहावयास सापडतात.[२]''

तळघरात ध्यानमंदिर आहे जेथे साईबाबांचे एक भव्य तैलचित्र ठेवण्यात आलेले आहे. ''या तैलचित्राच्या दोन्ही बाजूस स्वामी साईशरणानंद आणि बल्वबाबा यांच्या तसबिरी लावलेल्या आहेत. संगमरवरी दगडाचा वापर कलात्मक रितीने या मंदिराच्या बांधकामात करण्यात आला आहे. मंदिराचे बांधकाम, विद्युतीकरण, ध्वनीव्यवस्था व रंगकाम या सर्व गोष्टी अत्यंत व्यवस्थित करण्यात आल्या आहेत.[३]''

भुसारी घराण्याची अलीकडे संशोधनात उपलब्ध झालेली माहिती वि. बा. खेर यांच्या "श्री साईबाबांच्या जन्मस्थानाचा शोध" या लेखात सविस्तरपणे दिली आहे. तसेच पाथरी येथील साई जन्मस्थान मंदिर कसे निर्माण झाले या संबंधीचे महत्त्वाचे टप्पे या मार्गदर्शिकेत दुसऱ्या एका लेखात नमूद करण्यात आले आहेत. शिवाय स्वामी साईशरणानंद व बल्बबाबा यांच्या आशीर्वादाने पाथरी साई मंदिर साकार झाले, त्यांचा अल्प परिचय करून देणारे दोन लेख या पुस्तिकेत अंतर्भूत करण्यात आले आहेत.

आज पाथरी नगरीस जाण्याकरिता बसेसची भरपूर सोय आहे. पाथरीस मुंबई, पुणे, सोलापूर, अक्कलकोट, औरंगाबाद, नांदेड, अकोला, परभणी, उस्मानाबाद, लातूर येथून बसेसची सोय आहे. मनमाड, औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड या रेल्वे मार्गावर सेलू व मानवतरोड रेल्वे स्टेशनांनी हा भाग जोडलेला आहे. सेलू स्टेशनवरून पाथरीच्या मंदिराकडे जाण्यासाठी दर अर्ध्या तासाने सुटणाऱ्या एस्.टी. बसेस व रिक्षा यांची सोय आहे. पाथरी एस्.टी. बस स्थानकापासून हे मंदिर एक किलोमीटर अंतरावर आहे. या बसस्थानकाच्या पाठीमागे संत साईबाबा मार्गावर साई लॉज असून श्री साई मंदिरात राहण्याची व भोजनाची सोय आहे.

---

१ डॉ. भीमाशंकर देशपांडे, "श्री साई जन्मभूमी, पार्थपूर," भक्तीसंगम, मार्च २०००.

२. तत्रैव

३. तत्रैव

# श्री साईबाबांच्या जन्मस्थानाचा शोध

## (लेखक : वि. बा. खेर)

(साईबाबांचा जन्म, जन्मस्थान आणि त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमिका ह्यांचे गूढ उकलण्याच्या हेतूने लेखक व त्याची पत्नी ह्यांनी पाथरी गावास जून १९७५ मध्ये भेट दिली. तेथील लोकांबरोबरील संभाषणात सहजपणे मिळालेले धागेदोरे पकडून त्यांचा पाठपुरावा केला, चिकाटीने पुरावा जमा केला आणि धीमेपणाने एकत्र जोडला. सर्व पुरावा असा दर्शवितो की, पाथरी ही त्यांची जन्मभूमी असली पाहिजे व तेथील यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मणाच्या भुसारी कुटुंबात त्यांचा जन्म झाला असावा.)

"साईबाबा हे हिंदू नव्हते किंवा मुसलमान नव्हते; परंतु ते त्या दोघांच्या वरच्या श्रेणीचे होते."[१] असे एकदा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या प्रश्नाला उत्तर देताना सखाराम बळवंत धुमाळ, हे साईबाबांचे परमभक्त व नाशिकचे एक प्रसिद्ध वकील म्हणाले होते. हे उत्तर निश्चितपणे योग्य व अर्थपूर्ण होते. ईश्वरी पुरुष जातपात न पाहता मान देण्यास लायक असतो. मराठीतील एका लोकप्रिय म्हणीप्रमाणे नदीचे मूळ व ऋषीचे कूळ यांचा शोध घेऊ नये, कारण त्या दोघांचा आरंभ पाहिल्यावर संशोधकाची निराशा होण्याचा संभव असतो. ही म्हण कोणत्याही कारणासाठी पडली असली, तरी ती आता कालबाह्य झाली आहे. सध्याच्या तांत्रिक युगात सर्वच मूल्यांना आव्हान दिले जात असताना 'प्रत्येक धर्माचे प्रत्येक सूत्र याला जागतिक मान्यता मिळविण्याची असल्यास बुद्धी (विवेक) व सर्वत्र लागू पडणाऱ्या न्यायाच्या कसोटीला त्याला उतरणे जरूरीचे आहे.'[२] म्हणून काळाच्या वाळूवर ज्यांची पावले उमटली

आहेत त्या साधूपुरुषांना देखील ह्या सिद्धांताचे मागील सत्य लागू करणे योग्य होईल. प्रा. एरिक एच्. एरिकसन यांच्या 'गांधींचे सत्य (Gandhi's Truth)' ह्या ग्रंथात एक पाश्चात्य मानसशास्त्रज्ञ 'महात्मा गांधीच्या ऐतिहासिक वास्तव्याचा व ते ज्याला 'सत्य' म्हणत यांचा शोध घेतो त्यांचे वर्णन आहे.'[३] तो ग्रंथ ज्यांनी वाचला आहे त्यांना या विधानाचा संपूर्ण गर्भित अर्थ समजेल.

साईबाबांचे जन्मस्थान, कुठल्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला, इत्यादींचा शोध घेतल्याने त्यांच्या आयुष्यातील पुढील घटनांची संगत लागेल, या श्रद्धेने मी माझ्या पत्नीसह जून १९७५ मध्ये मराठवाड्याची यात्रा केली आणि जी माहिती मिळाली ती प्रस्तुत लेखात दिली आहे; परंतु असे करण्यापूर्वी साईबाबांचे स्वरूप, त्यांचा पोषाख, त्यांच्या खानपानाच्या सवयी, शिरडीतील त्यावेळची परिस्थिती आणि त्यांचे जन्मस्थान व कुटुंब यासंबंधी मांडलेली निरनिराळी मते या ठिकाणी थोडक्यात देतो.

साईबाबांची शरीरयष्टी भरभक्कम होती. ते अजानूबाहू व मध्यम उंचीचे होते. त्यांचा वर्ण गोरा, केतकी रंगाचा होता; परंतु ''त्यांचे डोळे पाणीदार असल्यामुळे त्यांची पहिलीच छाप त्यांच्या डोळ्यांमुळे पडत असे.'' त्यांच्या डोळ्यात एवढे तेज व तीक्ष्णता होती, की त्यांच्या डोळ्यांकडे पाहणाऱ्यास असे वाटे, की आपले अंतःकरण त्यांच्यापुढे संपूर्णपणे उघडे आहे.[४] त्यांचे कान टोचलेले होते[५] आणि त्यांची सुंता केलेली नव्हती.[६] यावरून ते हिंदू असावेत असे अनुमान निघते; परंतु त्यांचा पोशाख फकीरासारखा होता व ते एका जुन्या पडक्या मशिदीत राहत जिला ते 'द्वारकामाई' असे म्हणत. मशिदीत धुनी होती व तिच्यात् अग्नी सदैव पेटत असे. भक्तांना शंख वाजवून व घंटानाद करून त्यांची थाटात पूजा करण्याची सुद्धा मुभा असे.



मशिदीच्या बाहेरच्या अंगणात तुळसी वृंदावन असे. त्यांचे हिंदू भक्त अंगणात रामनवमीचा उत्सव साजरा करत व साईबाबा त्यात मोठ्या आनंदाने सामील होत. तसेच स्थानिक मुसलमानांना त्याच दिवशी संदल मिरवणूक काढण्यास त्यांची हरकत नसे. आहाराच्या बाबतीत ते उदार मताचे होते व इतर साथीदार फकीरांच्या समवेत त्यांनी मांस व मासे खाल्ले असल्याचे सांगण्यात येते. 'अल्ला मालिक' हे शब्द त्यांच्या जिभेवर नेहमीच असत. तरीही राम, कृष्ण, गणेश, शिव, हनुमान, दत्तात्रेय अथवा भक्ताचे गुरू ह्या स्वरूपात ते भक्तांना दर्शन देत. त्यांना भगवद्गीतेचे सूक्ष्म व गाढ ज्ञान होते हे त्यांच्या, नानासाहेब चांदोरकरांबरोबर झालेल्या गीतेच्या संवादात केलेल्या टीकेवरून स्पष्ट होते; परंतु ते मुसलमानांबरोबर कुराणाचा पहिला सुरा (अध्याय) म्हणत असत. त्यांना बऱ्याच भाषा अवगत होत्या; परंतु हे प्रभुत्व त्यांनी केव्हा व कसे प्राप्त केले हे कोणास ठाऊक नाही.

एकंदरीत ते, एक लोकोत्तर व्यक्ती होती आणि त्यांची घडण प्राचीन प्रख्यात संत योग्यांप्रमाणे झाली होती असे म्हणता येईल. त्यांच्यावर सुफी पंथाचा गहरा प्रभाव पडला असावा असे दिसते. यासंबंधी हे लक्षात ठेवले पाहिजे की, कोर्टाने नेमलेल्या चौकशी अधिकाऱ्यासमोर त्यांनी एकदा साक्ष दिली, तेव्हा एका प्रश्नाला उत्तर देताना साईबाबांनी असे सांगितले की, त्यांचे धर्मतत्त्व अथवा वैचारिक प्रणाली 'कबीर'[७] ही होती.

सॉलिसिटर हरी सीताराम दीक्षित, मुंबई विधान मंडळाचे माजी सभासद हे साईबाबांचे एक अत्यंत निःस्वार्थी भक्त होते. श्री साईसच्चरिताला लिहिलेल्या उपोद्‌घातात ते म्हणतात[८], ''महाराज मूळ कोठील राहणारे व त्यांची मातापितरे कोण, याविषयी खात्रीलायक माहिती मिळत नाही. एवढे मात्र खचित दिसते की, महाराजांचा मोंगलाईशी संबंध वराच असावा. महाराजांचे वोलण्यात शेलू, जालना,

माणवद (मानवत), पाथरी, परभणी, नौरंगाबाद (म्हणजे औरंगाबाद), बीड, बेदर या मोंगलाईच्या गावांचा वारंवार उल्लेख येत असे. एकदा एक पाथरीचा गृहस्थ महाराजांचे दर्शनाला आला होता. त्याला महाराजांनी पाथरीची हकीकत विचारून तेथील बहुतेक ठळक ठळक गृहस्थांची नावे घेऊन त्यांचेविषयी चौकशी केली. यावरून महाराजांना पाथरीची विशेष माहिती होती असे मानता येईल; पण त्यांचा जन्म तेथलाच असावा असे खात्रीलायक म्हणता येत नाही. तसेच महाराज मुळचे ब्राह्मण होते, की ते जन्मतःच मुसलमान होते हे निश्चयात्मक सांगता येत नाही.''[९]

महाराजांचे एक फार जुने भक्त म्हाळसापती असे म्हणत की, साईबाबांनी त्यांना एकदा सांगितले होते की, त्यांचा (साईबाबांचा) जन्म पाथरी येथे एका ब्राह्मण कुटुंबात झाला व लहानपणीच त्यांच्या आईवडिलांनी त्यांना एका फकीरास सुपूर्द केले. साईबाबांनी हे सांगितल्यानंतर थोड्याच दिवसांत पाथरीचा एक गृहस्थ काही कामासाठी शिरडीजवळच्या कोऱ्हाळा नामक एका गावी आला होता. तो शिरडीस आला असताना पाथरीच्या बऱ्याच रहिवाशांची चौकशी त्यांच्या नावनिशीवार साईबाबांनी केली.[१०] भगत म्हाळसापती हा सरळ स्वभावाचा सत्यवक्ता होता व त्याच्या वैराग्यामुळे साईबाबासुद्धा त्याला फार मान देत असत. त्यामुळे त्यांचे वरील निवेदन महत्त्वाचे व संशयातीत म्हणता येईल.[११]

आपल्या आईवडिलांविषयी कोणत्याही प्रश्नांना साईबाबा पुष्टी देत नसत आणि म्हणत, पुरुष माझा पिता व माया माझी माता आहे. आयुष्यभर संशोधन करणाऱ्या साईबाबांच्या एका चरित्र-लेखकाने असे म्हटले आहे की, ''साईबाबांचा जन्म हे एक गूढ आहे आणि त्याबद्दल प्रत्यक्ष ज्ञान असलेला एकही मनुष्य मला भेटलेला नाही.[१२]



वामन प्राणगोविंद पटेल, सॉलिसिटर ही सुद्धा अशी एक व्यक्ती आहे, की जिचा शब्द ह्या बाबतीत महत्त्वाचा मानला पाहिजे. १९५३ साली त्यांनी संन्यासाची दीक्षा घेतल्यानंतर ते स्वामी साईशरणानंद या नावाने ओळखले जातात. त्यांनी स्वीकारलेल्या नव्या नावावरून त्यांना साईबाबांच्याबद्दल किती आदर व भक्ती आहे हे स्पष्ट होते. प्रस्तुत विषयावर त्यांचा शब्द मानावयाचा असला तर त्यांचा या बाबतीतील अधिकार आपण, त्यांनी गुजरातीत लिहिलेल्या साईबाबांच्या चरित्रावरून समजून घेतला पाहिजे.

वामन प्राणगोविंद पटेल ह्यांचा जन्म ५ एप्रिल, १८८९ मध्ये झाला व ते आजमितीस हयात आहेत.[१३] १९१० साली मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजातून तत्त्वज्ञान हा विषय घेऊन ते उत्तीर्ण झाले आणि १९१२ मध्ये त्यांनी एलएल्.बी. ही पदवी प्राप्त केली. स्वामी विवेकानंदांप्रमाणे त्यांनाही परमेश्वराचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याची मनीषा होती. ह्याकरिता ते पुष्कळ साधुंना भेटले; परंतु त्यांची इच्छा कोणीच पुरी करू शकला नाही. शेवटी त्यांच्या वडिलांनी साईबाबांना भेटण्यास त्यांना सुचविले. त्याप्रमाणे १० डिसेंबर, १९११ रोजी ते मुंबईहून निघून कोपरगावला दुसऱ्या दिवशी गेले व तेथून टांग्याने शिरडीस पोहोचले. टांगा लेंडीपर्यंत आला तेव्हा टांगा थांबवून टांगेवाला म्हणाला, ''ते बघा, साईबाबा समोरून जात आहेत.'' वामनभाई तत्काळ टांग्यातून उतरून साईबाबांच्या पाया पडले आणि काय आश्चर्य ! साईबाबा त्यांना म्हणाले, ''परमेश्वर आहे. तो नाही असे का म्हणतोस ?'' साईबाबांशी झालेल्या स्वतःच्या पहिल्या भेटीचा वृत्तांत स्वामी शरणानंदांनी प्रस्तुत लेखकास सविस्तरपणे निवेदन केला. त्या भेटीने वामनभाईंचे समग्र जीवनात आमूलाग्र बदल होणार होता ! त्यांचे मनातील सर्व संदेह पूर्णपणे विराम पावले आणि त्यांना वाटले की, ज्यांचा सद्गुरू म्हणून संपूर्ण स्वीकार करावा

असा गुरू आपणास मिळाला आहे. पुढे १९१३ च्या उन्हाळ्याच्या सुटीत शिरडीस आले असता त्यांना साईबाबांनी अकरा महिने शिरडीत ठेवून घेतले आणि एके दिवशी त्यांनी न मागताच शिरडी सोडण्याची आज्ञा दिली. ह्या शिरडी येथील दीर्घ वास्तव्यात बाबा त्यांना भिक्षा मागण्यास पाठवीत. वामनभाई साईबाबांच्या दाट सान्निध्यात आले व बाबांनी मोठ्या प्रेमाने त्यांचे 'बाबू' असे टोपणनाव ठेवले.[१४]

पुढे यथावकाश वामनभाई हे सॉलिसिटरची परीक्षा उत्तीर्ण झाले व तो व्यवसाय करू लागले; परंतु त्यांची खरी आवड नैतिक व आध्यात्मिक गोष्टींबद्दलच होती. त्यांनी अहमदाबाद येथील सस्तु साहित्य वर्धक कार्यालयासाठी विपुल लेखन केले आहे. त्याचप्रमाणे मूळ मराठीतील संपूर्ण श्री साईसच्चरिताचा साध्या व सरळ काव्यात गुजरातीत अनुवाद केला आहे. ज्याला साईबाबांच्या जीवनाचा व शिकवणीचा आस्थापूर्वक अभ्यास करावयाचा असेल त्याने वामनभाईंनी गुजरातीत लिहिलेले साईबाबांचे चरित्र नजरेखालून घालणे अत्यंत आवश्यक आहे.[१५]

स्वामी साईशरणानंद ह्यांच्याबद्दल इतकी प्रास्ताविक माहिती दिल्यानंतर त्यांनी साईबाबांबद्दल काय सांगितले आहे त्याकडे वळू. ते म्हणतात की, 'ही गोष्ट वादातीत आहे की, साईबाबा स्वतःला ब्राह्मण मानीत व जर कुणी ते ब्राह्मण नसल्याचे सुचविले तर त्यावर ते नाराज होत.' १९१२ साली वामनभाईंच्या वडिलांना जलोदर झाला व त्यातून ते बाहेर पडण्याची शक्यता नव्हती. त्याच वर्षी डिसेंबर महिन्यात वामनभाई शिरडीला गेले होते. त्यांच्या मनातील विचार साईबाबांनी तात्काळ ओळखून त्यांना आपल्या वडिलांस शिरडीस घेऊन येण्यास सांगितले; परंतु लगेच दुसऱ्या क्षणी साईशरणानंदांच्या मनात विचार आला की, 'माझे सनातनी वृत्तीचे वडील मुसलमान समजले जाणाऱ्या फकीराकडे येतील का ?'



म्हणून बाबा तात्काळ म्हणाले, "काय, मी ब्राह्मण नाही ?" स्वामीजींनी असे पण लिहून ठेवले आहे की, बाबांचा सर्वात जुना भक्त म्हाळसापती याला बाबांनी स्वतःच असे सांगितले होते की, त्यांचा जन्म एका देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण कुलात झाला आणि लहानपणीच त्यांना एका फकीराकडे सुपूर्द करण्यात आले होते.[१६] स्वामी साईशरणानंद पुढे असे म्हणतात की, एकदा संभाषणात बाबांनी स्वतः त्यांना असे सांगितले होते की, ते आठ वर्षांचे असताना त्यांनी आपल्या घरादाराला, आईवडिलांना सोडून गंगेकाठी (बाबा गोदावरीला गंगा म्हणत) आले.[१७]

साईबाबांच्या जन्मकहाणीचे वर्णन सुमन सुंदर यांनी एका लेखात केले आहे.[१८] प्रस्तुत लेखकाला ती माहिती माधवनाथ नावाच्या साधुपुरुषाने सांगितले असे त्यांचे म्हणणे आहे. त्या लेखाचा सारांश स्वामी साईशरणानंद ह्यांनी जे साईबाबांचे गुजरातीत चरित्र लिहिले आहे त्याच्या सोळाव्या पानावर आहे. त्यात असे म्हटले आहे की, पाथरी येथील एका यजुर्वेदी ब्राह्मणास तीन मुलगे होते. त्यापैकी सर्वात वडील-मुलगा म्हणजे साईबाबा होत. ज्यावेळी साईबाबा पाच वर्षांचे होते, त्यावेळी त्या ब्राह्मणाकडे एक फकीर आला व त्याला म्हणाला, 'माझे मला परत दे.' त्यावर ब्राह्मणाने उत्तर दिले, 'माझ्याजवळ असलेले सर्व तुमचेच आहे.' त्यामुळे लगेच त्या फकीराने त्या ब्राह्मणाच्या मोठ्या मुलाला मागून घेतला व त्याला घेऊन तो निघून गेला. चार वर्षांनी तो फकीर परत आला आणि त्या ब्राह्मणाच्या संमतीने त्या मुलाला आणखी तीन वर्षांसाठी नेले. वयाच्या बाराच्या वर्षापासून अठराव्या वर्षापर्यंत बाबा अज्ञातवासात होते आणि एकोणीस वर्षांचे झाल्यानंतर ते शिरडीत कडुनिंबाच्या वृक्षाखाली प्रगट झाले.

सत्य साईबाबा स्वतःस शिरडीच्या साईबाबांचे अवतार समजतात. त्यांच्या चरित्रात आणखीच निराळी कथा आढळते. स्वामी साईशरणानंद

शिरडी साईबाबांच्या गुजराती चरित्रात पृ. १३ व पृ. २७-२८ वर त्या कथेचा उल्लेख करतात. साईबाबांचे आईवडील पाथरीचे रहिवासी असावेत असे दिसते. त्यांच्या वडिलांचे नाव गंगाभाव व आईचे नाव देवगिरीअम्मा असे होते. ते जोडपे धर्मशील असून शंकराचे भक्त होते. त्यांना अपत्य नसल्यामुळे ते दु:खी असत; परंतु त्यांनी शंकराची मनोभावे उपासना केल्यामुळे त्यांना शंकर-पार्वतीकडून वर मिळाला आणि शंकराने त्यांच्या कुळात साईबाबांच्या रूपाने जन्म घेतला. दिवसेंदिवस गंगाभाव तपामध्ये अधिकाधिक मग्न होऊ लागले आणि त्यांनी संसारत्याग करावयाचे ठरविले.

देवगिरीअम्मांनीयुद्धा त्यांच्याबरोबर जाण्याचा हट्ट धरला. त्याप्रमाणे साईबाबांना एका झाडाखाली ठेवून ती दोघेही अरण्यात निघून गेली. त्या बाजूने जाणाऱ्या एक फकीराच्या व त्याच्या बायकोच्या दृष्टीस ते मूल पडले आणि ती एक अल्लाची देणगी आहे असे समजून त्यांनी त्याचा स्वीकार केला व बारा वर्षांचा होईपर्यंत त्याचे पालन-पोषण केले. पुढे तेथील एका जमीनदाराच्या मुलाबरोबर झालेल्या खेळात साईबाबांनी एक शिवलिंग जिंकले व त्या शिवलिंगाबरोबर खेळण्याची त्यांना आवड जडली. म्हणून स्थानिक मुसलमानांनी त्या फकीराला साईबाबांना घालवून देण्यास भाग पाडले. त्यानंतर साईबाबा गोदावरीच्या तीरावर भटकू लागले व त्या भटकंतीत औरंगाबादेस पोहोचले. त्या ठिकाणी धूपखेड्याच्या चांदपाटलाची व त्यांची गाठ पडली व साईबाबांच्या कृपेने पाटलाला त्याची घोडी मिळाली. त्यानंतरचे साईबाबांचे चरित्र सर्वांना विदित आहेच.

अशा प्रकारे साईबाबांचा पाथरीशी नक्की संबंध असावा असे समजून आम्ही पाथरीला जाण्याचे ठरविले; परंतु ज्यावेळी आम्ही तो निर्णय घेतला त्यावेळी आम्हाला पाथरीची फारच थोडी माहिती होती. पाथरीचा जो इतिहास पुढे दिला आहे तो दखखनच्या



मध्ययुगीन इतिहासाच्या एक तज्ज्ञाबरोबरच्या चर्चेवरून व संदर्भ-ग्रंथांवरून मिळविला आहे.

पाथरी गावाला मध्ययुगीन कालात पार्थपूर म्हणत असत. हे नाव पार्थ अथवा अर्जुन ह्या शूर पांडवावरून पडले. ते देवगिरीच्या (दौलताबादेच्या) आग्नेयेस सुमारे १६० किलोमीटर आणि विदर्भ (मंगला) व गोदावरीच्या संगमापासून नैऋत्य दिशेस सुमारे ५ किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. हा भाग विदर्भ राज्यात मोडत असे व त्यावर देवगिरीच्या यादवांची सत्ता होती. त्या काळी पाथरी हे गणितशास्त्राचे एक विद्यापीठ होते.[१९]

पाथरी हे यादवराज्याचा एक भाग असल्यामुळे त्याचा इतिहास देवगिरी अथवा दौलताबादच्या इतिहासाशी निगडीत आहे. बहामनी राज्याचा अंमल असताना पाथरी गावचे कुळकर्णी वतन असलेले कुटुंब मोठ्या लौकिकास चढले. भैरो ऊर्फ भैरव कुळकर्णी ह्याचा मुलगा तिम्मभट हा संभवत: मुसलमानांच्या धर्मछळास कंटाळून तरुणपणी विजयनगरला गेला व तेथील राज्यात नोकरी धरली.[२०] १४४० च्या आसपास विजयनगरच्या राज्याविरुद्धच्या एका मोहिमेत सुलतान शहा बहामनीने त्याला पकडून बिदरला आणले. १४३२ मध्ये बहामनी राज्याची राजधानी गुलबर्ग्याहून बिदर येथे हलविण्यात आली होती.[२१] तेथे तिम्मभटाला बाटवून मुसलमान करण्यात आले. त्याचे नाव बदलून हसन असे ठेवले गेले व त्याला राजाचा गुलाम म्हणून ठेवण्यात आले. सुलतानाने त्याची हुशारी पाहून ज्येष्ठ राजपुत्र महंमदच्या सोबतीस त्याला ठेवले. त्याचे सर्व शिक्षण ज्येष्ठ राजपुत्रा-बरोबरच झाले व त्याने पर्शियन व अरबी भाषेवर प्रभुत्व मिळविले. त्याच्या वडिलांच्या भैरो या नावावरून त्याचे नाव मल्लिक भैरो असे पडले; परंतु राजपुत्राला ते नाव उच्चारण्यास कठीण पडू लागल्यामुळे त्याला भैरी या नावाने लोक संबोधू लागले. राजपुत्र

महंमद राज्यपदी आरूढ झाल्यानंतर त्याने आपल्या सोबत्यास एक हजार घोड्यांचा मनसबदार बनविले.[२२]

आपल्या अंगभूत गुणांमुळे मल्लिक हसन हा कालांतराने वीस हजार घोड्यांचा मनसबदार पदास चढला आणि त्याला मिर-ए-शिकार हा किताब त्याबरोबर असणाऱ्या सर्व मानचिन्हांसह देण्यात आला. नंतर कुशबेग ह्या पदी त्याची नियुक्ती झाली. १४७१ मध्ये ओरिसाचा राजा मंगलराय विरुद्धच्या लढाईत मल्लिक हसनने अनुकरणीय शौर्य गाजवून त्याचा पराभव केला व हमवीराला पुन्हा गादीवर बसविले. तसेच त्याने राजमंडरी काबीज करून कोंडविडुचे अनेक किल्ले सर केले.

वरील सर्व कामगिरीसाठी त्याला अशरफ-ए-हुमायुन निझाम-उल्-मुल्क ह्या किताबाने गौरविण्यात आले व त्याची तेलंगणाचा सरलष्कर म्हणून नेमणूक झाली. त्याने सर्व तेलंगण पादाक्रांत केला व कर्नाटकवर हल्ला करण्याची तयारी केली. नोव्हेंबर १४८० मध्ये त्याने कोंडविडुवर आपले वर्चस्व स्थापले व त्यासाठी त्याला मसनद-ए-अली व उल्लुघ-ए-आझम हे किताब देऊन राजमंडरीचा सुभेदार नेमण्यात आले. त्यानंतर तो सुलतानाबरोबर विजयनगरच्या राज्याविरुद्ध मोहिमेवर गेला व कांचीचा किल्ला जिंकला. मोहिमेच्या परतीच्या चालीत कोंडपल्लीच्या मुक्कामात त्याने बहामनी राज्याचा दिवाण महमुद गवान याचा खून करविला. महमुद गवानाच्या मृत्युमुळे राज्याचा कारभार मल्लिक हसनच्या हाती आला. त्याने काही वर्षे राज्यकारभार सांभाळला; परंतु महमुद गवानाच्या खुनामुळे फाटफुटीस चालना मिळून वैराच्या अस्वस्थ वातावरणात सुभेदारांनी स्थानिक लोकांना खूश करून आपली स्थाने मजबूत बनविली. मल्लिक हसनला सुभेदारांना काबूत ठेवणे कठीण झाले आणि शेवटी त्याच्याच एका आश्रिताने १४८६ साली त्याचा खून केला.



या घडामोडींमुळे मल्लिक हसनचा मुलगा अहमद याला स्वतःच्या कर्तबगारीवर स्वतंत्रपणे राज्य करण्याच्या कल्पनेला स्फूर्ती मिळून त्याने उघडपणे बंड केले व जलद ऱ्हासपंथाला लागलेल्या राजवटीला अखेरचा निर्णयात्मक धक्का देण्याचे ठरविले. जुन्नरला पोहोचल्यावर स्वतःची बहरी निझाम-उल्-मुल्क म्हणून त्याने घोषणा केली आणि आपल्या वडिलांच्या शत्रूंविरुद्ध चढाई करून अहमदनगरच्या निजामशाहीची स्थापना केली.[२३]

१५१८ मध्ये पहिल्या बुऱ्हाण निजामशहाने वऱ्हाड राज्याच्या अल्लाउद्दिन इमादकडून पाथरी तालुका व नगराची दुसऱ्या एका तालुक्याच्या बदल्यात मागणी केली. मागणीचे कारण असे सांगितले की, पाथरी हे त्याच्या पूर्वजांचे गाव होते व त्याचे अनेक नातेवाईक तेथील रहिवासी होते. अल्लाउद्दिन इमादने त्या मागणीस नकार दिल्यामुळे बुऱ्हाण निजामशहाने त्याच्या विरुद्ध युद्ध पुकारून त्याचे राज्य खालसा केले.[२४] अखेरीस दखनमधील मोंगल बादशहाचा सुभेदार निझाम याने पाथरीसहित दौलताबादवर आपला अंमल स्थापन केला व त्या वेळेपासून पाथरी हे परभणी जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण आहे. १८५३ पर्यंत परभणी हा जिल्हा विदर्भ अथवा वऱ्हाड प्रांताचा एक भाग होता; परंतु निझामाने वऱ्हाड प्रांत १८५३ च्या तहाने ब्रिटिशांच्या स्वाधीन केल्यापासून परभणी जिल्हा विदर्भापासून वेगळा करून पाथरीसकट निझामाच्या राजवटीतील मराठवाड्याला जोडण्यात आला.

मनमाड–सिकंदराबाद रेल्वे लाईनवरील मानवत स्टेशनपासून पाथरी १६ किलोमीटर आहे व सेलू स्टेशनपासून २३ किलोमीटर आहे. साईबाबांच्या बालपणासंबंधीची विश्वासार्ह माहिती मिळविण्यासाठी १९७५ च्या उन्हाळ्यात काही दिवस पाथरीला मुक्काम करण्याचे आम्ही ठरविले त्यावेळी पूर्वनियोजित खुनांच्या

सत्रामुळे मानवत प्रसिद्धीच्या झोतात होते. जून १९७५ पर्यंत पाथरीत ज्यांच्याकडे आम्ही उतरणार होतो त्यांच्याबरोबर आम्ही दुवा साधला होता. दिनकरराव चौधरी हे पाथरी गावातील प्रसिद्ध चौधरी घराण्याचे एक वंशज आहेत. ह्या घराण्याच्या मागे दीर्घ इतिहास आहे. दिनकरराव चौधरी हे एक प्रगतीशील शेतकरी व वकील आहेत. आमचा मुक्काम त्यांच्याकडेच होता. त्यांनी आमचे आदरातिथ्य व्यवस्थित केलेच. शिवाय आमचे हे कार्य स्वत:चेच कार्य आहे असे समजून आम्हाला सर्वथैव सहाय्यही केले.

चौधरी कुटुंबाच्या पुष्कळ शाखा पाथरी गावात आहेत; परंतु तेथे असलेल्या सुमारे १४ व्या शतकात बांधलेल्या एका गढीत त्यातील बहुतेक राहतात. दिनकरराव चौधरी ह्यांनी आता सदरील गढीच्या बाहेर घर बांधले आहे व ते तेथेच राहतात.[२५] पाथरीच्या आमच्या मुक्कामात त्याच घरी आम्ही राहत होतो. दिनांक २१ जूनला संध्याकाळी आम्ही सहज माडीवरील पुढच्या पडवीत गप्पा मारीत बसलो असता दिनकरराव म्हणाले, "बऱ्याच वर्षांपूर्वी, माझे वडील वासुदेवराव, भाऊ भुसारी ह्या नावाचा गृहस्थ गढीत माधुकरी मागण्यासाठी प्रवेश करीत असता त्याच्याकडे बोट दाखवून म्हणाले, "पहा, काय वाईट स्थिती झाली आहे साईबाबांच्या एका वंशजाची !"[२६] दुसऱ्या दिवशी दिनकररावांचे काही मुसलमान अशील त्यांच्याकडे आले होते. ते म्हणाले की, त्यांच्या माहितीप्रमाणे साईबाबांचा जन्म पाथरी येथील एका ब्राह्मण कुटुंबात झाला होता; परंतु ते लहान असतानाच एक अवलिया त्यांना घेऊन गेला होता आणि पुढे काय झाले ते मात्र त्यांना ठाऊक नव्हते. ह्या त्यांच्या बोलण्यामुळे ह्या बाबतीतील आणखी एक धागा हाती आला. म्हणून पाथरी गावातील सर्व ब्राह्मण कुटुंबांची यादी करण्याच्या तयारीस आम्ही लागलो.



पाथरी गावातील सर्व ब्राह्मण देशस्थ आहेत. त्यातील काही ऋग्वेदी तर काही आहेत यजुर्वेदी. ह्याशिवाय अन्य कोठल्याही पोटभेदाची ब्राह्मण कुटुंबे पाथरी गावात नाहीत. आम्ही घरोघरी हिंडून कुटुंबातील वडील माणसांकडून जी माहिती गोळा केली त्यावरून असे कळले की, ब्राह्मण कुटुंबांपैकी बहुतेकांचे कुलदैवत माहूरची रेणुकादेवी किंवा आंबेजोगाई येथील योगेश्वरी हे आहे. ह्याला अपवाद एकच दिसला व तो म्हणजे भुसारी कुटुंबाचा. हे कुटुंबही माध्यंदिन शाखेचे शुक्लयजुर्वेदीच आहे व त्यांचे गोत्र कौशिक आहे; पण त्यांचे कुलदैवत मात्र पाथरी गावच्या सीमेवरच्या कुंभारबावडी अथवा पंचबावडीचा हनुमान आहे. ही गोष्ट कळल्यावर आमच्या विचारांना अगदी नवीन दिशा दिसली. श्रीराम व हनुमान ह्यांच्याबद्दल साईबाबांना वाटणारा आदर व भक्ती ह्यांची आठवण होऊन आम्हाला वाटले, "काय आमचे संशोधन अखेरीस सफल होणार !" तात्काळ आम्ही वैष्णव गल्लीत गेलो व भुसारींच्या पडक्या घराचे अवशेष (घर क्रमांक ४-४३८-६१) अत्यंत आदरपूर्वक पाहिले आणि कुंभारबावडी येथील हनुमानाच्या दर्शनास गेलो. पाथरी गावाच्या वेशीवर लेंडी नावाचा ओहोळ आहे व त्यावरून शिरडीच्या लेंडीबागेची आठवण झाली. ह्या दोहोंतील संयोग स्पष्ट आहे. मराठवाड्यामध्ये सर्वसाधारणपणे प्रचारात असलेली मराठी बोली व साईबाबांची मराठी भाषा यात पुष्कळच साम्य आढळले. मराठवाड्यातील सर्व स्तरावरील लोक एकच भाषा बोलताना आढळतात.

पाथरीची लोकसंख्या सुमारे दहा हजार आहे; परंतु बाह्य देखाव्यात पाथरी काही शतकांपूर्वी जसे होते तसेच असेल असे प्रथम दर्शनी भासले. गावाला प्रगतीचा स्पर्श फार अल्प झाला आहे असे वाटले.[२७] अलीकडे काही वर्षांत तेथे वीज आली आहे व एस्.टी. बस सेवेमुळे ते अन्य गावांशी जोडले गेले आहे; परंतु


अन्यथा त्या ठिकाणचे जीवन पुराण काळी जसे संथ असेल तेवढेच अजूनही संथ आहे. माझे मन बाबा ज्या भूतकाळात जन्मले तिकडे वळले. त्यांच्या जन्माचे वर्षही निश्चितपणे कोणालाच माहीत नाही. त्याचप्रमाणे त्यांचे शिरडीत केव्हा आगमन झाले ह्याबद्दलही मतभेद आहेत. श्री साईसच्चरिताप्रमाणे ते शिरडीला प्रथम १८५४ साली आले. नंतर गुप्त झाले व पुन्हा १८५८ साली प्रगट झाले. साईबाबा शिरडीत प्रथम १८७२ साली आले या मताचे बी. व्ही. नरसिंहस्वामी[२८] आहेत व एम्. व्ही. प्रधान[२९] त्यांच्याशी सहमत आहेत. १५ ऑक्टोबर १९१८ ला त्यांनी महासमाधी घेतली हे मात्र सर्वांना मान्य आहे आणि त्यांचे जे फोटो आहेत त्यावरून त्यांच्या वयाचे अनुमान तेवढे आपण करू शकतो.

तर मग साईबाबांचा जन्म पाथरी येथील भुसारी कुटुंबात झाला असे रास्त खात्रीने आपण म्हणू शकतो ? पाथरी येथील एका प्रसिद्ध नागरिकाने ह्या विषयाची माहिती आपल्या मुलास सांगितली. त्याशिवाय अन्य काही पुरावा उपलब्ध आहे का ? हा पुरावा गोळा करण्यासाठी ह्या गोष्टीचा पाठपुरावा करण्याचे मी ठरविले. प्रोफेसर रघुनाथ महारुद्र भुसारी यांच्याशी मी पत्रव्यवहार सुरू केला. पाथरी येथील घराचे तेच सध्या मालक आहेत. प्रारंभी ओस्मानिया विश्वविद्यालयात ते मराठीचे प्राध्यापक होते व संस्कृत पण शिकवीत. नंतर ते सरकारी महाविद्यालयाचे प्राचार्य झाले व त्याच पदावरून १९५९ साली सेवानिवृत्त होऊन हैदराबाद येथेच स्थायिक झाले. त्यांचा जन्म पाथरी येथे झाला व तेथेच त्यांचे प्राथमिक शिक्षणही झाले. ते आठ वर्षांचे असताना त्यांचे वडील मरण पावले. बाराव्या वर्षी त्यांनी पाथरी सोडले व जिल्ह्याचे ठिकाण परभणी येथे पुढील शिक्षणासाठी गेले. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते हैदराबादला गेले व तिसऱ्या क्रमांकाने बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. ह्यामुळे त्यांना कलकत्ता विश्वविद्यालयाची एम्.ए.साठी शिष्यवृत्ती



मिळाली आणि तीही परीक्षा १९२६ मध्ये संस्कृत व पुराण वस्तुसंशोधन हे विषय घेऊन ते यशस्वी झाले. तेथे त्यांनी डॉ. देवदत्त रामकृष्ण भंडारकर यांच्या हाताखाली भारताचा प्राचीन इतिहास व संस्कृती यांचा अभ्यास केला. त्यानंतर नागपूर विश्वविद्यालयाची एम्.ए.ची परीक्षा मराठी हा विषय घेऊन ते चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाले.

प्रो. भुसारी म्हणतात की, कोनेरदादा हे त्यांचे पहिले ज्ञात असलेले पुरुष. नंतर दोन पिढ्यांची काही माहिती उपलब्ध नाही; परंतु त्यानंतरच्या तीन पिढ्यांचा वंशवृक्ष मिळतो तो पुढीलप्रमाणे :–




प्रा. भुसारी पुढे असे म्हणतात की, लहानपणी त्यांच्या आजीने त्यांना असे सांगितले होते की, हरीभाऊ, अंबादास व बलवंत हे सर्व पाथरी गाव कायमचे सोडून गेले होते. ह्यांपैकी हरीभाऊ हे परमेश्वराच्या शोधात गेले असावेत; परंतु इतर दोघे मात्र नशीब काढण्यासाठी घराबाहेर पडले. पुढच्या पिढीतील परशुरामबापुंनी देखील मंजार्थ ह्या ठिकाणी संन्यास घेतला होता. हे ठिकाण बीड जिल्ह्यातील गोदावरी व सिंधुफेणा ह्या नद्यांच्या संगमावर आहे. परशुरामबापुंचा मुलगा भाऊ हा फारसा शिकलेला नव्हता व तो गरिबीतच मृत्यू पावला. वासुदेवराव चौधरी हे आपला मुलगा दिनकरराव ह्यांच्याजवळ ज्या व्यक्तीबद्दल बोलले तो हाच ''भाऊ'' होय. पाथरी येथील भुसारी

कुटुंबात उच्च विचाराच्या व आचाराच्या व्यक्ती निपजल्या हे दाखविण्यास एवढा पुरावा पुरेसा आहे. मग भुसारी कुटुंबातील हरीभाऊ भुसारी हे तर साईबाबा असावेत का ?

येथवर मांडलेले प्रमेय संभवनीय आहे. ह्याची चर्चा मी एका अनुभवी वकिलाबरोबर व एका प्रसिद्ध इतिहास तज्ज्ञाबरोबर एकाचवेळी केली. त्यावेळी त्यांनी असे मत व्यक्त केले की, हे शक्य कोटीतील आहे, म्हणून मी आता त्याबद्दल आणखी काही न लिहिता ह्या विषयाचा निवाडा करण्याचे काम वाचकांवर सोपवितो. हा लेख लिहीत असता मला असे समजले की, पाथरी गावातील रहिवाशांची अशी इच्छा आहे की, साईबाबांच्या पवित्र स्मरणार्थ त्यांचे एक उचित स्मारक पाथरीत उभारावे. त्यांच्या प्रयत्नास ईश्वर यश देवो अशी सदिच्छा मी व्यक्त करून येथेच हा लेख संपवितो.[३०]

### संदर्भ व टीपा

१ बी. व्ही. नरसिंहस्वामी, डिव्होटीज एक्स्पिरिअंसिस ऑफ साईबाबा (इंग्रजी), भाग १, ऑल इंडिया साई समाज, मद्रास, तिसरी आवृत्ती, १९६५, पृ. ४३, ४८ वर.

२ एम्. के. गांधी, इन सर्च ऑफ दी सुप्रीम (इंग्रजी), भाग १, नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद, १९६१, पृ. १४८

३ एरिक एच्. एरिकसन, गांधीज ट्रूथ (इंग्रजी), डब्ल्यू. डब्ल्यू. नॉर्टन आणि कं. इंक, न्यूयॉर्क, १९६९, पृ. ९

४ बी. व्ही. नरसिंहस्वामी, डिव्होटीज, एक्स्पिरिअंसिस ऑफ साईबाबा, भाग १, पृ. ९२

५ गो. र. दाभोलकर, श्री साईसच्चरित, श्री साईबाबा संस्थान, शिरडी, ८ वी आवृत्ती, १९७२, अध्याय ७, पृ. १३



६ स्वामी साईशरणानंद, श्री साईबाबा (गुजराती), ६ वी आवृत्ती, १९६६, पृ. १७; (इंग्रजी), स्टर्लिंग पब्लिशर्स प्रा. लि., नवी दिल्ली, १९९७, पृ. १३ आणि आर. बी. पुरंदरे, डिव्होटीज एक्स्पिरिअंसिस ऑफ साईबाबा, भाग १, पृ. १०४, ११४ वर.

७ बी. व्ही. नरसिंहस्वामी, तथैव, भाग २, पृ. ४६

८ गो. र. दाभोलकर, श्री साईसच्चरित

९ तत्रैव, हरी सीताराम दीक्षित यांचा उपोद्घात, पृ. १

१० श्री साईलीला, स्फुट लेख, एप्रिल १९२५, पृ. १७९

११ बी. व्ही. नरसिंहस्वामी, लाईफ ऑफ साईबाबा (इंग्रजी), भाग १, ऑल इंडिया साई समाज, मद्रास, १९५५, पृ. १३–१४

१२ तत्रैव, पृ. १२

१३ स्वामी साईशरणानंद, २५ ऑगस्ट, १९८२ मध्ये बुधवारी रात्री १२ वाजून २० मिनिटांनी ब्रह्मीभूत झाले. त्यांचा नश्वर देह १४/१५ प्रकृतिकुंज सोसायटी, न्यू शारदा मंदिर रोड, अहमदाबाद - ३८० ०१५ येथील आवारात पुरण्यात येऊन त्याचेवर समाधी उभारण्यात आली.

१४ श्री साईलीला, सप्टेंबर, १९७५, पृ. ४, ६ वर

१५ स्वामी साईशरणानंद, तथैव (गुजराती), १९६६, (इंग्रजी), १९९७

१६ तत्रैव (गुजराती), पृ. १४-१५; (इंग्रजी), पृ. १०-११

१७ तत्रैव (गुजराती), पृ. ६; (इंग्रजी) पृ. ५

१८ श्री साईलीला, जुलै-सप्टेंबर १९४२, पृ. ३५९-३७२

१९ एस्. बी. दीक्षित, भारतीय खगोलशास्त्राचा इतिहास, दुसरी आवृत्ती, १९३१, पृ. २६७, २६९ व २७८

२० लेफ्टनंट कर्नल सर वुल्सले हेग, दी हिस्टरी ऑफ दी निझामशाही किंग्स ऑफ अहमदनगर, (इंग्रजी), ब्रिटिश इंडिया प्रेस, मुंबई १९२३, पृ. ७ (टीप)

२१ प्रो. एच्. के. शेरवानी व डॉ. पी. एम्. जोशी, हिस्टरी ऑफ मेडीव्हल डेक्कन (१२९५-१७२४), (इंग्रजी), भाग १, गव्हर्नमेंट ऑफ आंध्र प्रदेश, १९७५, पृ. २२५-२२८

२२ लेफ्टनंट कर्नल जॉन ब्रिग, हिस्टरी ऑफ दी राइज ऑफ महामेडन पावर इन इंडिया टिल ए.डी. १६१२ (इंग्रजी), भाग ३, लॉंगमन रीस, ऑर्म, ब्राउन व ग्रीन, १८२९, पृ. १८९-९०

२३ प्रो. एच्. के. शेरवानी व डॉ. पी. एम्. जोशी, तथैव, पृ. २२५-२२८

२४ लेफ्टनंट कर्नल सर वुल्सले हेग, तथैव, पृ. ७ (टीप)

२५ ऑक्टोबर १९९९ पासून दिनकरराव चौधरी यांचा मुक्काम संत साईबाबा मार्गावर एस्.टी. स्थानकाच्या पाठीमागच्या बाजूस स्वतःच्या इमारतीत असतो.

२६ ह्या संशोधन लेखात पुढे उद्धृत केलेला भुसारी कुटुंबाचा वंशवृक्ष पाहावा.

२७ प्रस्तुत लेखक तेरा वर्षांनंतर १९९३ मध्ये पाथरीस गेला तेव्हा पाथरी नगरीचा चेहरामोहरा त्यास बदललेला आढळला. पहिला ग्रामीण देखावा जाऊन त्याऐवजी अनियोजित शहरीकरण झालेले दिसले. शहरातून एक हमरस्ता जातो व साखर कारखाना



स्थापन झालेला आढळतो. गावाची संख्या तिप्पट वाढली असली तरी सुविधांच्या विकासाचा अभाव दिसतो.

२८ बी. व्ही. नरसिंहस्वामी, तथैव, भाग १, पृ. १३

२९ एम्. व्ही. प्रधान, श्री साईबाबा ऑफ शिरडी (इंग्रजी), श्री साईबाबा संस्थान, शिरडी, ७ वी आवृत्ती, १९७३, पृ. २५

३० शिरडी साईबाबांच्या पाथरीतील जन्मस्थानाची जागा श्री साई स्मारक समितीच्या नावे, वि. बा. खेर व दिनकरराव चौधरी अशा दोघांनी मिळून खरीदली व समितीचे सार्वजनिक न्यास म्हणून बॉम्बे पब्लिक ट्रस्टस ॲक्ट, १९५० या कायद्याखाली पी.टी.आर. नं. ई-४३ (परभणी) अशी नोंदणी करून घेतली. मंगळवार, १९ ऑक्टोबर, १९९९ ला विजया दशमीच्या मुहूर्तावर साईबाबांच्या पाथरी येथील अप्रतिम मंदिराचे श्री. के. व्ही. रमणी, शिरडी साई ट्रस्ट याचे संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त यांचे हस्ते उद्घाटन झाले. त्यांच्या उदार देणगीमुळेच सध्याच्या देखण्या रूपात मंदिर साकार झाले. मंदिराच्या गाभाऱ्यात श्री साईबाबांची साडेपाच फुटाची ब्रॉंझच्या सोनेरी रंगाच्या मूर्तीची स्थापना केली असून, बाबांच्या चांदीचे आवरण असलेल्या संगमरवरी पादुका पूजेसाठी बसविण्यात आल्या आहेत. गाभाऱ्याचे पुढे विस्तीर्ण सभामंडप आहे. तळघरात ध्यानमंदिर बांधलेले आहे. तेथे बाबांचे सहा फूट उंचीचे सुंदर यथास्वरूप तैलचित्र ठेवले असून, त्याच्या एका बाजूस स्वामी साईशरणानंद व दुसऱ्या बाजूस बल्वबाबा यांच्या तसबिरी आहेत. संगमरवरी दगडाचा बांधकामात विपुल प्रमाणात खुबीदारपणे उपयोग करण्यात आला आहे.

☆ ☆ ☆

# पाथरी साई जन्मस्थान मंदिर स्थापना

## महत्त्वाचे टप्पे

१) **जून १९७५** – पाथरीस वि. बा. खेर यांची सपत्नीक भेट.

२) **जानेवारी १९७६** – वि. बा. खेर यांचा 'ए सर्च फॉर दी बर्थ प्लेस ऑफ साईबाबा' हा लेख साईलीला (इंग्रजी) मासिकात छापून आला.

३) **१ जून, १९७८** – वि. बा. खेर व दिनकरराव चौधरी यांनी मिळून प्रा. र. म. भुसारी यांचेकडून साईबाबा जन्मस्थान जमीन 'श्री साई स्मारक समिती' स्थापून समितीच्या नावे खरेदी केली व खरेदीखताची सेलू येथील सबरजिस्ट्रारच्या कचेरीत नोंदणी करून घेतली.

४) **३१ डिसेंबर, १९८०** – श्री साई स्मारक समिती, पाथरी हिची ई-४३ (परभणी) या नंबराने सार्वजनिक न्यास (ट्रस्ट) म्हणून नोंदणी झाली.

५) **मार्च १९८१** – श्री. सुभाष दळी, आर्किटेक्ट यांनी पाथरी साईजन्मस्थान मंदिराच्या इमारतीचा नकाशा तयार केला व त्यावर 'बाळंतिणीची खोली' दर्शविली.

६) **सप्टेंबर १९८२** – वि. बा. खेर यांची औरंगाबाद जवळच्या धूपखेड्याला भेट. त्या भेटीनंतर औरंगाबादेत गुलमंडी येथे बल्बबाबा या सत्पुरुषाची खेर दांपत्याशी गाठ पडली तेव्हा त्यांनी रु. २० दक्षिणेचा स्वीकार करून असा आशीर्वाद दिला की, 'जमीन घेतली आहे. रु. २० लाखाचे मंदिर



त्यावर तयार होईल. देशाच्या सर्व भागातून लोक तेथे येतील. तुमचे या भागातील त्या निमित्ताने येणे-जाणे वाढेल व आपली परस्परांची भेट होईल.'

७) **१३ ऑक्टोबर, १९९४** – विजया दशमीच्या दिवशी मंदिराचा 'भूमीपूजन' समारंभ अब्दुल्लाखान दुर्राणी, अध्यक्ष, पाथरी नगर परिषद, यांचे हस्ते झाला.

८) **मे १९९५** – मंदिराच्या वास्तुच्या उत्खननास सुरुवात – उत्खननात जाती, मारुती व खंडोबांच्या मूर्ती, पूजेची उपकरणे, पणत्या इत्यादी वस्तू सापडल्या.

९) **१० जून १९९५** – बेड कॉंक्रिटचे पायाभरणीचे कामास सूर्यभान सांगडे, मॅनेजर, स्टेट बॅंक ऑफ हैदराबाद, पाथरी यांचे हस्ते सुरुवात.

१०) **१८ जुलै, १९९५** – वि. बा. खेर, सीताराम धानु व आर्किटेक्ट सुभाष दळी यांची पाथरीस भेट – खोदकामात दोन कमानी व एक भुयार आढळल्याने, आर्किटेक्ट दळींच्या सल्ल्याप्रमाणे मंदिराच्या खाली पूर्ण तळघर बांधण्याचा निर्णय घेण्यात आला.

११) **२० डिसेंबर, १९९५** – वि. बा. खेर व दोन अधिक अर्जदार यांचा बॉम्बे पब्लिक ट्रस्टस ॲक्ट, १९५०, कलम ५०-ए खाली सहाय्यक धर्मादाय आयुक्त, परभणी यांचे ऑफिसात श्री साई स्मारक समिती, पाथरी, ई-४३ (परभणी) या न्यासाच्या मॅनेजमेंटसाठी योजना तयार करण्यासाठी अर्ज.

१२) **१ ऑक्टोबर, १९९६** पासून दोन वर्षांसाठी काही अपरिहार्य कारणामुळे मंदिर बांधकाम बंद ठेवण्यात आले.

१३) १३ जुलै, १९९८ रोजी परभणी जिल्हा कोर्टात सर्व संमतीने करारपत्र दाखल करण्यात येऊन खालील व्यक्तींचे पहिले विश्वस्त मंडळ नेमण्यात आले :—

१) विश्वास बाळ खेर
२) सीताराम सोमा धानु
३) दिनकर वासुदेव चौधरी
४) अब्दुल्लाखान दुर्राणी
५) कालीदास चौधरी
६) सूर्यभान तुलसीराम सांगडे
७) सुभाष राजाराम दळी

१४) **९ ऑगस्ट, १९९८ –** विश्वस्त मंडळाच्या पहिल्या सभेत, वि. बा. खेर यांना अध्यक्ष, दि. वा. चौधरी यांना व्यवस्थापकीय विश्वस्त व सू. तु. सांगडे यांना खजिनदार म्हणून निवडण्यात आले.

१५) **१९ ऑक्टोबर, १९९९ –** विजया दशमी – के. व्ही. रमणी, संगणक व्यवसायातील उद्योगपती आणि संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त, शिरडी साई ट्रस्ट, चेन्नाई, ज्यांच्या उदार, भरीव व सढळ हाताने केलेल्या अर्थसहाय्यामुळे पाथरी येथील साईंच्या भव्य व सुंदर मंदिराचे काम साकार झाले, त्यांचेच शुभहस्ते मंदिराचे, साईबाबांच्या महासमाधीच्या दिवशी, उद्घाटन झाले.

१६) त्या उद्घाटनासाठी विश्वस्त मंडळाने श्री. सीताराम धानू यांच्या अध्यक्षतेखाली शिर्डी साई प्राणप्रतिष्ठा समिती नेमली व तिच्या मुंबई शाखेचे तेच अध्यक्ष होते. त्या मुंबई शाखेने उत्कृष्ट कार्य केले व भरीव आर्थिक सहाय्यही केले.

☆ ☆ ☆



# स्वामी साईशरणानंद – अल्प परिचय

**हदय शुष्क म्हारूं, हंमेशनुं नही भीनुं**
**कदी कदी प्रेम सरिता सूकी, लहरी भरती ओट चालू**
**आ दुष्ट हदय म्हारूं ।**
**हदय लवण गळी प्रेमसरिते, निर्मळ जळ हंमेश वहे**
**शांत थइ तद्रूप बनुं हुं, हुं पण त्यारे क्यांथी रहे**
**हदय एवुं ते क्यारे थशे ?**
**भेदाभेद बळी स्थूळ सूक्ष्म तो आपोआप खरी पडशे**
**त्यारे वामनडा तूं मळशे सांइस्वरूपमां निश्चे**
**हदय खरूं त्यारे भिनशे ।।**

– 'श्री साईलीला', वर्ष ३, अंक २-३, पृ. २२५

जून १९७४ मध्ये मी शिरडीस साईबाबांच्या समाधीच्या दर्शनास गेलो तेव्हा बाबांचा सहवास लाभलेल्या अशा कोणी थोर व्यक्तीच्या शोधात असता स्वामी साईशरणानंदांचे नाव माझ्या ऐकण्यात आले. नंतर मी अहमदाबादला गेलो असता त्यांना समक्ष भेटलो. तेव्हा 'वामनडा' कोण याचा उलगडा झाला.

साईबाबांनी आपला स्वत:चा आश्रम किंवा पीठ स्थापले नाही, कोणता ग्रंथ लिहिला नाही व कोणाही शिष्याला दीक्षा देऊन आपली गादी चालविण्याची उठाठेव केली नाही; परंतु त्यांचे असंख्य भक्त होते व आहेत. त्यातील एक ऋषितुल्य व प्रसिद्धी-पराङ्मुख व्यक्ती, की जिने **''नर करणी करे तो नर का नारायण हो जाएगा''** ही म्हण आपल्या जीवनात सार्थ करून दाखविली, ती व्यक्ती म्हणजे स्वामी साईशरणानंद होय ! त्यांचे संपूर्ण नाव श्री. वामनभाई प्राणगोविंद पटेल. त्यांचा जन्म ५ एप्रिल.

१८८९ साली सुरत जिल्ह्यातील, इतिहासप्रसिद्ध बार्डोली तालुक्यातील मोटा या गावी झाला. त्यांचे वडील श्री. प्राणगोविंद लालभाई पटेल हे केंद्रीय सरकारच्या अबकारी (मीठ) खात्यात नोकरीस होते व कामानिमित्ताने निरनिराळ्या गावी त्यांची बदलीही होई. त्यांच्या मातोश्री सौ. मणिगौरी या तत्कालीन शिक्षणतज्ज्ञ श्री. तुळजाराम सोमनाथ यांच्या सुकन्या होत. वामनभाईंचे आजोबा लालभाई हे नवसारीत तलाठी म्हणून बरीच वर्षे कामाला होते व त्यांची एक चोख, प्रामाणिक व शिस्तप्रिय, परंतु दयाळू सरकारी नोकर म्हणून ख्याती होती. त्यांच्या आजी नंदकुवर या स्वभावाने फार धार्मिक होत्या. एकंदरीत पाहता त्यांचे घराणे सुखवस्तू व शिक्षणात पुढारलेले असे होते.

वामनभाईंचे प्राथमिक शिक्षण मोटा येथे सुरू झाले. १८९६ साली ते खेडा येथे त्यांचे काका रामगोविंद यांच्याकडे राहण्यास आले. तेथे प्राथमिक शिक्षण संपून माध्यमिक शिक्षणास सुरुवात झाली. रामगोविंद कलेक्टरच्या कचेरीत अव्वल कारकून होते. त्यांनी वामनभाईंना 'रामरक्षा' स्तोत्र शिकविले व त्यांच्याकडून ते पाठ करवून घेतले. येथूनच त्यांच्या धार्मिक शिक्षणाची सुरुवात झाली. १८९९ साली त्यांच्या वडिलांची अहमदाबाद येथे बदली झाली. तेथे ते पुढील इंग्रजी शिक्षणासाठी गेले. १९०३ साली पुन्हा त्यांच्या वडिलांची बदली मुंबई येथे झाली व ते माटुंगा येथे राहण्यास आले. वामनभाईंचे नाव बोरीबंदर जवळच्या न्यू हायस्कूलमध्ये घालण्यात आले. त्या हायस्कूलचे नंतर भर्डा न्यू हायस्कूल म्हणून नामांतर झाले; भर्डा हे त्या हायस्कूलचे माननीय प्रिन्सिपॉल होते. वामनभाई १९०५ मध्ये मॅट्रिकच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले.

त्या काळी मुंबईत तीन महाविद्यालये होती – विल्सन कॉलेज, सेन्ट झेवियर्स कॉलेज व एलफिन्स्टन कॉलेज. त्या महाविद्यालयांची



एका टर्मची फी अनुक्रमे रु. ३६, रु. ४८ व रु. ६४ अशी होती. वामनभाईंचे वडील सरकारी नोकर असल्यामुळे त्यांनी आपल्या पुत्रास एलफिन्स्टन कॉलेजमध्ये दाखल केले. बी.ए. साठी वामनभाईंनी तत्त्वज्ञान हा विषय घेऊन १९०९ साली पदवी संपादन केली. त्यांच्या सहाध्यायांमध्ये मनु सभेदार होते, जे पुढे सेंट्रल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद झाले. १९११ साली वामनभाई एल्‌एल्‌.बी. झाले. दरम्यान त्यांनी जहांगीर गुलाबभाई विलिमोरिया या सॉलिसिटर पेढीमध्ये आर्टिकल क्लार्क म्हणून नाव नोंदविले.

त्या काळच्या रूढीप्रमाणे वामनभाईंचा विवाह त्यांच्या तेराव्या वर्षी श्री. अंबाराम कृष्णशंकर शुक्ल यांची कन्या कलावती हिच्याशी झाला. बालपणापासून वामनभाईंची वृत्ती धार्मिक होती आणि तिचे पोषण घरच्या धार्मिक वातावरणात झाले. बालपणातच रामरक्षा, विष्णुसहस्रनाम व आदित्य हृदयस्तोत्र ते पठण करण्यास शिकले. ते पाच वर्षांचे असताना त्यांचे वडील धारासणाच्या मीठागरावर काम करीत होते. तेथे राहण्याची गैरसोय होती व त्यातच कित्येक महिन्यांपासून छोट्या वामनला अमांश व अतिसाराच्या विकारांनी घेरले होते. त्यांची अशक्तता इतकी वाढली की जगतो की मरतो, अशी त्यांची स्थिती झाली. एका संध्याकाळी त्यांची आई तंबूच्या बाहेर त्यांना घेऊन बसली असता एकाएकी एक फकीर तिच्यापुढे येऊन उभा राहिला आणि म्हणाला,

"हा मुलगा फार भाग्यशाली आहे !"

आई म्हणाली,

"कसला भाग्यशाली ! त्याला इतके जुलाब होत आहेत की तो दोन-चार दिवसांचाच सोबती आहे, असे आम्हा सर्वांना वाटते."

"नाही, नाही, असे बोलू नका. हा खरोखरीच फार भाग्यवान आहे बर ! त्याच्या उजव्या कुशीत चामखीळ व उजव्या बाजूस तीळ आहे."

त्याच्या आईने झबलं उंच करून पाहिले, तर खरेच त्याच्या अंगावर फकीराने सांगितलेल्या खुणा होत्या. ते पाहून त्याची आई म्हणाली,

"तुम्ही सांगितलेली गोष्ट खरी आहे; पण याच्या आजाराचे व तब्येतीचे काय ?"

फकिराने उत्तर दिले,

"हे भस्म देतो, ते त्याच्या तोंडात टाका, म्हणजे सर्व ठीक होईल."

स्वामी साईशरणानंद आपल्या आत्मचरित्रात लिहितात की, त्यानंतर दुसऱ्या काही उपचाराविना त्यांची प्रकृती सुधारावयास लागली व त्यांचे आईवडील चिंतामुक्त झाले.

वामन सात वर्षांचा असताना खेड्याच्या शाळेत शिकत होता, तेव्हा तो श्रावण किंवा कार्तिक महिन्यात पहाटे उठून स्नान करी आणि मातोश्री किंवा बहिणीसोबत सोमनाथ महादेवाच्या दर्शनास जाई. त्याला मंदिराबाहेर एक फकीर भेटे, जो त्याची थट्टामस्करी करी; तसेच कधी कधी शाळेत जातानासुद्धा त्याची गाठ पडे. १९११ साली वामनभाई साईबाबांना प्रथम भेटले, तेव्हा त्यांना उलगडा झाला की, खेड्याचा फकीर दुसरा-तिसरा कुणी नसून ते साईबाबाच होते. एकदा भरबैठकीत साईबाबा हाताचे तळवे थोडे दूर धरून हरि सीताराम दीक्षितांना वामनभाईसंबंधी म्हणाले,

**"अरे ! याला मी पुष्कळ वर्षांपासून ओळखतो. हा उंदराएवढा होता त्या वेळेपासून याची-माझी ओळख आहे."**



ही सर्व हकीकत वामनभाईंनी आपल्या माऊलीला सांगितली तेव्हा तिने त्यांना धारासणाचा वरील सर्व किस्सा सांगितला.

वामनभाई इंटरआर्टस् वर्गात असताना त्यांचे संध्यापूजा वगैरे धार्मिक विधींवरचे लक्ष उडून त्यांनी ते पाळण्याचे थांबविले; परंतु सवयीने प्रातःस्नानानंतर स्तोत्र पठण करण्याचे सोडले नाही. रात्री निजण्यापूर्वी ते भगवद्गीता वाचत, कारण त्यायोगे त्यांना मानसिक बळ प्राप्त होत असे. भर्तृहरीचे नीतिशतक व वैराग्यशतक वाचून त्यांची खात्री झाली की, आर्यावर्ताचे ध्येय वैराग्यामार्फत ईश्वरप्राप्ती हे होते. इंटरआर्टस् परीक्षेत तर्कशास्त्र विषयात त्यांना पहिल्या श्रेणीचे गुण मिळाल्यामुळे त्यांनी तत्त्वज्ञान हा विषय बी.ए.साठी निवडला. त्याकाळी एलफिन्स्टन कॉलेजमध्ये आर्.एस्. मार्स हे तर्कशास्त्र व तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर होते. जर्मन व ग्रीक भाषांचे ते पंडित होते आणि कांट या तत्त्ववेत्त्याचे ग्रंथ त्यांनी मूळ भाषेत वाचले होते. कांट यांच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने वामनभाईंचे मन विचलित झाले. ईश्वर खरोखर आहे का ? का ती एक मानवी कल्पना आहे ? या जगामागे एक जागृत नियामक शक्ती आहे का ? का ते अकस्मात निर्माण झाले ? या विचारात ते पडले. जितका जास्त विचार त्यांनी केला तितका या जगतामागील गूढ उकलण्याची व परमेश्वराचे प्रत्यक्ष दर्शन होण्याची त्यांची उत्कटता स्वामी विवेकानंदांप्रमाणे वाढली. अशा मनःस्थितीत असता त्यांच्या वडिलांनी त्यांना बाळकृष्ण महाराजांकडे नेले. वामनभाईंनी बाळकृष्ण महाराजांना स्पष्ट सांगितले की, जो त्यांना ईश्वरप्राप्ती करवून देईल त्यालाच ते गुरु म्हणून स्वीकारतील. आता वामनभाईंना आपल्या शंकाकुशंकांचे निवारण करणाऱ्या एखाद्या महात्म्याची भेट घेण्याची तळमळ लागली. त्यांना फार वेळ वाट पाहावी लागली नाही. त्यांचे वडील नुकतेच साईबाबांचे दर्शन घेऊन परतले होते व त्यांनी

वामनभाईंना सांगितले की, ज्याच्या शोधात ते होते ते सर्व देण्याची शक्ती साईबाबांकडे आहे. म्हणून १० डिसेंबर, १९११ रोजी वामनभाईंनी शिरडीस प्रयाण केले. प्रथमदर्शनीच वामनभाईंनी त्यांना दंडवत घातला आणि काय आश्चर्य ! साईबाबा टासून वामनभाईंना एकदम म्हणाले,

**''ईश्वर आहे ! नाही का म्हणतोस ?''**

त्या मुलाखतीने वामनभाईंचे सारे जीवनच पालटणार होते.

पुढे १९१३ मध्ये उन्हाळ्याच्या सुट्टीत वामनभाई शिरडीस गेले असता त्यांना आज-उद्या करीत करीत तब्बल अकरा महिने साईबाबांनी ठेवून घेतले. शिरडी येथील दीर्घ मुक्कामात साईबाबा त्यांना रोज चार-पाच घरी भिक्षा मागण्यास पाठवीत. पूर्वकर्म नष्ट करण्यासाठी साईबाबांनी त्यांच्याकडून गायत्री पुरश्चरण करून घेतले; तसेच त्यांना साधना करण्यास शिकविले, ज्ञानेश्वरी व तत्सम दुसरे ग्रंथ वाचून घेतले व आध्यात्मिक अनुभव दिले. इतकेच नव्हे, तर साईबाबा त्यांना प्रेमाने 'बाबू' म्हणू लागले. एक दिवस परवानगी न मागताच ''आपल्याला उद्या जायचंय'', ह्या शब्दांत साईबाबांनी त्यांना अनुज्ञा दिली.

शिरडीतील दीर्घ वास्तव्यामुळे वामनभाईंच्या आर्टिकल क्लार्कच्या मुदतीत खंड पडला. मुंबईस परतल्यावर त्यांनी पेढीचे ज्येष्ठ भागीदार जहांगीर यांची भेट घेतली, तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, पहिले भरलेले तेरा महिने, खंड पडल्यामुळे गणता येणार नाहीत व प्रथमपासून पुन्हा आरंभ करून पुरी दोन वर्षे भरावी लागतील.

याच सुमारास दोन नोकऱ्या त्यांना सांगून आल्या – एक पोलीस प्रॉसिक्यूटरची व दुसरी नवसारीतील सी.जे.एन्.एल्. हायस्कूलमध्ये शिक्षकाची. साईबाबांच्या सल्ल्यानुसार त्यांनी शिक्षकाची



नोकरी पत्करून एक वर्ष ती जबाबदारी सांभाळली. नंतर उन्हाळ्याच्या सुट्टीत ते गुलाबभाई या पेढीच्या दुसऱ्या भागीदारांना भेटले. त्यांनी वामनभाईंना मुंबई हायकोर्टाच्या सरन्यायाधीशांकडे मुदतीत पडलेला खंड माफ करण्यासाठी अर्ज करण्यास सांगितले. तसा अर्ज केल्यावर सरन्यायाधीशांनी खंड माफ करून उरलेल्या फक्त अकरा महिन्यांची मुदत पुरी करण्याचा हुकूम केला. मुंबई हायकोर्टाच्या इतिहासात असे दुसरे उदाहरण नाही, असे म्हणतात.

१९१६ साली एके दिवशी शिरडीस निघालेल्या काही मंडळींच्याबरोबर बाबांसाठी हार, पुष्प वगैरे साहित्य देण्यासाठी ते रेल्वेस्थानकावर आले; परंतु शिरडीस स्वत: जाण्याची एकदम इच्छा होऊन एक अंगावरील कपड्यानिशी ते शिरडीस गेले व तेथे चांगले तीन आठवडे राहिले. शिरडीस बाबा त्यांची वाट पाहत होते, असे त्यांना तेथे कळले. शिरडी येथील त्यांच्या या निवासात बुटीसाहेबांच्या वाड्याचे बांधकाम चालू असताना, तेथे जवळ उभे असता, त्यांच्या डोक्याखांद्यावर एक मोठा दगड पडला व त्यामुळे काही काळ ते बेशुद्ध होते. बाबांच्या उपचाराने त्यांना थोड्याच वेळात शुद्धी आली व काही दिवसांत जखम भरून आली. वरील अपघातामुळे काही वर्षे ते सॉलिसिटरच्या परीक्षेस बसू शकले नाहीत.

पुढे मार्च १९१७ ते जानेवारी १९२१ पर्यंत त्यांनी अहमदाबादच्या मॉडेल हायस्कूलच्या प्रिन्सिपॉल पदाची जबाबदारी सांभाळली. काही काळ त्यांनी कांगा व सयानी या सॉलिसिटरच्या पेढीत असिस्टंट म्हणून काम केले. नंतर मनु सुभेदार यांच्या पायोनियर रबर कंपनीत एक वर्ष काढले. १९२३ च्या नोव्हेंबरात वामनभाई सॉलिसिटरच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले.

१९२४ ते १९३२ या काळात त्यांनी कायद्याच्या क्षेत्राला आपला बराच वेळ दिला. जानेवारी १९२४ पासून सव्वा वर्ष त्यांनी

नानावटी आणि कंपनी ही सॉलिसिटरची पेढी चालवली. नंतर काही महिने चोकसी आणि कंपनीत काम केले व जुलै १९२५ ते सप्टेंबर १९२६ पर्यंत ते परळकर अँड पटेल या पेढीत भागीदार होते. पुन्हा एकदा त्यांना अहमदाबादच्या मॉडेल हायस्कूलमध्ये प्रिन्सिपॉल म्हणून काम करण्याची इच्छा झाली; परंतु १९२९ मध्ये ते मुंबईच्या लॉ कॉलेजमध्ये प्रोफेसर झाले आणि कंपनी व इंसॉलव्हंसी ह्या दोन कायद्यांवर त्यांनी पुस्तकेही लिहून छापली. एका वर्षानंतर त्यांनी ही नोकरी सोडून क्रॉफर्ड बेली आणि कंपनी या सॉलिसिटरच्या प्रसिद्ध पेढीत १९३२ पर्यंत काम केले. यानंतर मात्र त्यांनी मुंबई सोडली ती सोडलीच. १९३५ ते १९५० पर्यंत त्यांनी उमरेठ येथे तेथील हायस्कूलचे प्रिन्सिपॉलपद विभूषित केले.

सॉलिसिटर म्हणून किंवा शाळेचे प्रिन्सिपॉल म्हणून काम करताना काय, जरी त्यांनी आपली जबाबदारी लक्ष देऊन उत्तम रीतीने पार पाडली तरी ते संसारात असून नसल्यासारखे होते; कारण हे सर्व करीत असताना त्यांचे चित्त ईश्वरचरणी–गुरुचरणी जडलेले होते. जून १९२४ ते सप्टेंबर १९२६ हा त्यांचा कडक तपश्चर्येचा काळ होता, असे स्वामी साईशरणानंद स्वत: आपल्या आत्मचरित्रात म्हणतात. त्यामुळे व्यावहारिकदृष्ट्या त्यांना जरी म्हणण्यासारखी धनप्राप्ती झाली नाही तरी स्वत:च्या पारमार्थिक प्रगतीबद्दल त्यांना संतोष होता.

त्यांच्या पत्नी सौ. कलावतीबहेन १९५१ साली वारल्या. त्यांच्यापासून वामनभाईंना एक मुलगा व एक मुलगी अशी संतती झाली. पैकी मुलाचा अंत झाला; परंतु मुलीला साईबाबांच्या कृपेने चांगले स्थळ मिळाले. त्यांचे नाव सौ. त्रिवेणीबहेन जोशी होते. त्यांचीसुद्धा साईबाबांवर निस्सीम श्रद्धा व निष्ठा होती आणि त्यांनी अहमदाबाद येथील साईमंदिरात बरीच सेवाही केली. त्यांचा १ ऑगस्ट, १९७८ रोजी मृत्यू झाला.



जरी मधून मधून वामनभाई स्फुटलेखन करीत असत व त्यांनी दासगणूंच्या साईबाबांवरील दोन पुस्तिकांचे – 'स्तवनमंजिरी' व 'अर्वाचीन भक्त व संतलीलामृत' यातील ४ अध्याय यांचे गुजरातीत भाषांतर केले होते, तरी त्यांच्या स्वतंत्र लिखाणास १९४६ मध्ये सुरुवात झाली, असे म्हणता येईल. त्या वर्षी त्यांनी 'श्री साईबाबा' या नावाचे साईबाबांचे गुजरातीत ५११ पानांचे रसाळ जीवनचरित्र प्रसिद्ध केले. हा ग्रंथ इतका मान्यता पावला, की १९६६ पर्यंत त्याच्या ६ आवृत्त्या छापल्या गेल्या. साईबाबांच्या जीवनाची गुरुकिल्ली व त्यातील मर्म समजून घ्यायची ईच्छा असणाऱ्यास हा ग्रंथ म्हणजे एक मेवाच होय ! १९५२ मध्ये वामनभाईंनी 'श्री साईलीलाख्यान' हा पद्यामध्ये गुजराती ग्रंथ प्रकाशित केला. शिवाय श्री. अण्णासाहेब दाभोलकरांच्या श्री साईसच्चरिताचे त्यांनी ओवीरूपात मधुर भाषांतर करून गुजरातमधील साईभक्तांना उपकृत करून ठेवले आहे.

गुजरातमध्ये सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक सद्‌भिरूची वृद्धिंगत करण्यासाठी 'सस्तु साहित्यवर्धक कार्यालय' या नावाची संस्था बरीच वर्षे काम करीत आहे. तिच्या मालकीचा एक मोठा छापखाना अहमदाबादमध्ये आहे. श्री. मनु सुभेदार हे त्यांच्या निधनापर्यंत या संस्थेचे प्रमुख होते. 'अखंडानंद' म्हणून एक मासिक वरील संस्था काढते आणि स्वस्त, चांगले व विपुल असे वाङ्मय गुजराती जनतेला उपलब्ध करून देते. मनु सुभेदारांनी वामनभाईंना ११.१२.१९५० पासून या संस्थेत जोडून घेतले. वामनभाईंची बरीच पुस्तके या संस्थेने प्रकाशित केली आहेत. त्यात भगवद्‌गीता, श्री शंकराचार्य, मनुष्यधर्म, सती सावित्री, श्री प्रल्हाद, अंबरीष, शुकदेव, गजेंद्रमोक्ष, संत ज्ञानदेव, धर्मकथा, चांगदेव पासष्टी, नित्यपाठ, जप अने नामस्मरण, श्री रामकृष्ण वचनामृत, सिद्धांतमाला ही प्रमुख होन.

सर्व संसारपाशातून मुक्त होऊन संन्यास घेण्याचा विचार वामनभाईंच्या मनात अनेक दिवसांपासून घोळत होता. म्हणून ३१ मार्च,१९५३ रोजी ते सस्तु साहित्यवर्धक कार्यालयाच्या व्यापातून मुक्त झाले व आषाढ शुद्ध १, १२ जुलै, १९५३ रोजी डाकोरला जाऊन संन्यासी मठात संन्यास घेण्याचा त्यांचा निश्चय पक्का झाला. त्याप्रमाणे १२.७.१९५३ रोजी संन्यास-विधी सुरू झाला व १४.७.१९५३ रोजी तो पूर्ण होऊन वामनरावांनी 'स्वामी साईशरणानंद' हे नाम धारण केले. हे लक्षात ठेवण्यासारखे आहे की, संन्यास घेताना त्यांनी कोणी गुरू केला नाही, कारण आचार्यांकडून महावाक्यांचा जो उपदेश घ्यावयाचा असतो तो वामनभाईंना साईबाबांनी अगोदरच केला होता व हे ज्ञान त्यांना अनुभवासह दिले होते, असे स्वामी साईशरणानंदांनी लिहून ठेवले आहे. त्यानंतर ते २९ वर्षे व्रती व तपस्व्याचे जीवन जगले. २५ ऑगस्ट, १९८२, मध्यरात्र संपून २० मिनिटे झाली व इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे २६ ऑगस्ट, गुरुवार सुरू झाला तेव्हा स्वामी साईशरणानंद आत्मतत्त्वात विलीन होऊन ब्रह्मीभूत झाले. त्यांची समाधी अहमदाबाद येथे खालील पत्त्यावर आहे :—

१४/१५, प्रकृतिकुंज सोसायटी,
न्यू शारदा मंदिर रोड, श्रेयस हायस्कूलसमोर,
अहमदाबाद - ३८० ०१५.

त्यांच्या निर्वाणानंतर त्यांनी तीन पुस्तके 'साईनाथने शरणे' (१९८३), 'ब्रह्म परिमल' (१९८६) व 'सिद्धामृत' (१९८७) प्रसिद्ध झाली. ती त्यांच्या ज्ञानाची साक्ष देतात. त्यांना आपल्या पांडित्याचा बिलकुल अभिमान नव्हता; उलट त्यांचे व्यक्तिमत्त्व लोभस व स्वभाव विनयशील होता. साईशरणानंदांची तपश्चर्या दांडगी होती व अधिकारही तसाच होता, हे त्यांच्या सहवासात आलेल्या साईभक्तांना माहीत आहेच. त्यांना अनेक सिद्धी प्राप्त होत्या;



परंतु त्यांनी त्यांचा गाजावाजा कधीच केला नाही. श्री साईसच्चरिताच्या ४०व्या अध्यायात साईबाबांनी डहाणूचे मामलेदार बाळासाहेब देव यांचे उद्यापनाचे निमंत्रण स्वीकारताना त्यांना कळविले होते की ते स्वतः, बापूसाहेब जोग आणि तिसरा एक येऊन जेवून जातील. त्यापैकी तिसरे वामनभाई होते, हे फार थोड्या लोकांना माहीत आहे. त्याप्रमाणे बंगाली संन्याशाच्या वेशात दोन मुलांसह साईबाबा डहाणूस जावून कसे जेवले व मायेच्या पटलामुळे देवांनी त्यांना कसे ओळखले नाही, ती सुरस कथा त्या अध्यायात वर्णिलेली आहे. प्रसिद्धी ही विष्ठेसारखी आहे, अशी त्यांची स्पष्टोक्ती होती. म्हणूनच त्यांनी प्रसिद्धीच्या झगमगाटात येण्याचे कटाक्षाने टाळले. ही त्यांच्या महानतेची खूण आहे.

☆ ☆ ☆

# श्री बल्बबाबा – अल्प परिचय

बल्बबाबा ही व्यक्ती त्यांच्या काळात औरंगाबादमध्ये एक कुतूहलाचा विषय होती. तेथील काही हिंदू त्यांना पाकिस्तानी हेर समजत, तर मुस्लिम समाजाचे काही लोक त्यांना पोलीस खात्यातील गुप्तहेर मानत; परंतु औरंगाबादेतील गुलमंडी येथील मारुती मंदिरात ते दुपारी येऊन बसत. तेथील आसपासचे सर्व जमातीचे लोक त्यांचेकडे एक अवलिया या नजरेने बघत असत. विशेषतः औरंगाबादेतील टुरिस्ट गाईड प्रवाशांना एका अवलियाचे तोंडावरील विलक्षण हास्य दाखविण्यासाठी त्यांचेकडे घेऊन जात असत.

श्री. वसंत न. लिमये हे सी.आय.डी. इंटलिजन्स खात्यातून ३८ वर्षांच्या सेवेनंतर सिनियर इंटलिजन्स ऑफिसर या पदावर असताना १९९४ डिसेंबरमध्ये निवृत्त होऊन औरंगाबाद येथेच स्थाईक झाले. ते स्वतः बल्बबाबांना ओळखत असत व त्यांनी बल्बबाबांचे नाव, गाव, पेशा, साधना, सिद्धी, पोशाख, समाधी ह्यासंबंधी माहिती कळविली त्यावरून खालील मजकूर संकलित करण्यात आला आहे. ते म्हणतात की, बल्बबाबा यांचे संपूर्ण नाव आसाराम यशवंत ऊर्फ येसूजी बनकर होते आणि त्यांचा जन्म बाबरा या गावी माळी समाजातील एका कुटुंबात झाला. बाबरा हे गाव औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात असून ते औरंगाबादच्या उत्तरेस ५५ किलोमीटर अंतरावर आहे. बाबरा या गावी बालाजीचे पुरातन मंदिर तसेच गणपती मंदिर आहे. आसाराम हे हरणाबाई यांचे पुत्र; परंतु त्यांना पुतळाबाई नावाची सावत्र आई सुद्धा होती.

आसाराम यांचा सौ. कां. मथुरा बाबाईशी विवाह झाला होता व त्यांच्यापासून त्यांना एक अपत्य झाले. ते मूल दोन महिन्यांचे असताना वारल्यामुळे १९४७ साली घरादाराचा त्याग करून आसाराम औरंगाबादला



गेले. औरंगाबाद येथे ते प्रथम टांगा चालवत असत व नंतर कापड गिरणीत नोकरीला होते. गिरणीत अपघात झाल्याने ती नोकरी सोडून ते नाशिकला गेले; परंतु आसारामजींचे पुतणे कचरूजी किसराव बनकर त्यांना नाशिकहून औरंगाबादला घेऊन आले व आपल्या घरी ठेवले. कचरूजी हे स्टेशन रोडवर न्यू पंजाब हॉटेलमध्ये सुपरवायझर म्हणून काम करतात व उस्मानपुरा मोहल्ल्यात राहतात.

त्यानंतर आसारामजी ध्यानधारणा व साधना करण्यासाठी कचनेर येथे गेले. हे ठिकाण औरंगाबादपासून औरंगाबाद-बीड मार्गावर सुमारे ४० किलोमीटर असून तेथे महादेवाचे व देवीची मंदिरे आहेत. या त्यांच्या साधनेमुळे जरी ते अशिक्षित होते, तरी त्यांना वाचासिद्धी प्राप्त झाली व अभ्यासाने अध्यात्मामध्ये त्यांची चांगली प्रगती झाली असे म्हणतात. त्याचा अनेकांना प्रत्यय आल्याचे समजते. त्यात वि. बा. खेर हेसुद्धा आहेत.

कचनेरहून औरंगाबादला परतल्यानंतर काही काळ त्यांचा मुक्काम कब्रस्तानाच्या मोकळ्या जागेवर होता; परंतु तेथे त्यांना समाजकंटकांकडून उपद्रव झाल्याने ते औरंगाबाद येथील पैठण दरवाज्याजवळील कानफाट्या मारुती मंदिरात १९५६-५७ च्या आसपास वास्तव्यासाठी आले. ह्या मंदिराचे छप्पर पूर्वी पत्र्याचे होते व या छपराखाली बल्बबाबा निजत.

आसारामजींचा पोशाख फार विचित्र असे. सोलापूर चादरींचा अथवा घोंगड्यांचा गळ्यापासून घोट्यापर्यंत लांब अंगरखा ते पेहनत. त्यांचे शिरावर वासुदेवासारखी टोपी असे. त्या टोपीला अनेक रंगांचे व आकाराचे बल्ब तसेच मोरपिसे, कवड्यांच्या व रुद्राक्षांच्या माळा बांधलेल्या असत. दोन्ही हातात ते विविध धातूंची कडी वगैरे घालत व पायात मोटरच्या टायरपासून बनविलेल्या फॅन्सी चपला असत. ह्या त्यांच्या पोशाखावरून बल्बबाबा हे नाव त्यांना पडलेले असावे.

दुपारी ते गुलमंडीच्या कुठल्या तरी दुकानासमोर येऊन उभे राहत. त्या दिवशी त्या दुकानाची विक्री तेजीत असे असा लोकांचा अनुभव होता. तसेच जवळच एक मेवाती हॉटेल होते. त्याचा मालक बल्बबाबांना फार मान देई व त्याने आपल्या नोकरवर्गाला सूचना देऊन ठेवली होती, की जेव्हा जेव्हा बल्बबाबा हॉटेलात येतील तेव्हा त्यांचा योग्य सत्कार व आदरातिथ्य झाले पाहिजे.

१९८२ च्या सप्टेंबरमध्ये औरंगाबादेतील टुरिस्ट गाईड के. के. जुंबडे, वि. बा. खेर व त्यांच्या पत्नींना बल्बबाबांना बघण्यासाठी घेऊन गेले होते. अबोल म्हणून जरी बल्बबाबांची ख्याती होती तरी त्यांनी पाऊण तास अस्खलितपणे खेर दांपत्याला शुद्ध वेदांताचा उपदेश केला व संभाषणात कबीरांचे दोहे, साखी इत्यादींचा युक्त वापर केला. भेटीअंती खेरांनी वाकून बल्बबाबांना नमस्कार केला व वीस रुपयाची दक्षिणा दिली. तेव्हा रुपये वीस लाखांचे मंदिर पाथरीत तुमच्या हातून उभारले जाईल व देशाच्या सर्व भागांतून तेथे लोक येतील इत्यादी आशीर्वाद दिला. साई मंदिर साकार झालेले पाहण्याचे भाग्य खेरांना लाभले ही काय साधी गोष्ट आहे ?

बल्बबाबा यांना दिनांक ७ ऑक्टोबर, १९९१ (भाद्रपद कृष्णपक्ष सोमवती अमावास्या) सोमवार रोजी पहाटे सूर्योदयाच्या सुमारास त्यांच्या राहत्या खोलीत म्हणजे प्लॉट नं. १५२, गांधी नगर, फायर ब्रिगेडच्या मागे, औरंगाबाद येथे देवाज्ञा झाली. जशी बल्बबाबांची जन्मतारीख अथवा साल याबद्दल माहिती उपलब्ध नाही तसेच अंतसमयी त्यांचे वय नक्की किती हे सांगता येत नाही ; परंतु अंदाजे ते ८०-८५ च्या आसपास असावे असे म्हणतात. जेथे त्यांना देवाज्ञा झाली त्याच जागी बल्बबाबांची समाधी आहे. त्या समाधीवर असलेल्या खोलीत ते राहत असत. त्यांचा मोठा फोटो व त्यांनी वापरलेल्या वस्तू – पोशाख, पलंग, लाकडी झोपाळा, ताट-वाटी, तांब्या इत्यादी त्या खोलीतच नीट मांडून ठेवलेल्या आहेत.

☆ ☆ ☆



# पाथरी साई जन्मस्थान मंदिरात साजरे होणारे वार्षिक उत्सव

## तीन दिवसांचे उत्सव

१) श्रीरामनवमी (चैत्र शु. ९)

२) व्यास–गुरू पौर्णिमा (आषाढ)

३) विजया दशमी दसरा (आश्विन शु. १०)
— श्री साईबाबा महासमाधी दिन मंदिराचा वर्धापन दिन

## एक दिवसाचे उत्सव

१) हनुमान जयंती (चैत्र पौर्णिमा)

२) स्वामी साईशरणानंद जयंती (५ एप्रिल)

३) श्रीकृष्ण जयंती (श्रावण व. ८)

४) स्वामी साईशरणानंद पुण्यतिथी – २६ ऑगस्ट

५) श्री. बल्बबाबा पुण्यतिथी – ७ ऑक्टोबर

६) श्री दत्तात्रेय जयंती (मार्गशीर्ष पौर्णिमा)

☆ ☆ ☆

# श्री साईबाबा अष्टोत्तरशतनामावलि:

(ही नामावली चेन्नाईच्या ऑल इंडिया साई समाज या ट्रस्टचे संस्थापक श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी यांनी रचलेली आहे. श्री साईंच्या मूर्तीला किंवा नाण्याला अभिषेक करतेवेळी ती म्हणण्यास उपयुक्त होईल.)

१) ॐ श्री साईनाथाय नमः ।
श्री साईनाथांना नमस्कार असो.

२) ॐ लक्ष्मीनारायणाय नमः ।
लक्ष्मीनारायणरूपी साईनाथांना नमस्कार असो.

३) ॐ कृष्णरामशिवमारुत्यादिरूपाय नमः ।
कृष्ण, राम, शिव, मारुती इत्यादीरूपी साईनाथांना नमस्कार असो.

४) ॐ शेषशायिने नमः ।
शेष नागावर निद्रा करणाऱ्या विष्णुरूपी साईनाथांना नमस्कार असो.

५) ॐ गोदावरीतटशीलधीवासिने नमः ।
गोदावरी काठी शीलधी म्हणजे शिरडी येथे राहणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

६) ॐ भक्तहृदालयाय नमः ।
भक्ताच्या हृदयात राहणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

७) ॐ सर्वहृन्निलयाय नमः ।
सर्वांच्या हृदयात राहणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

८) ॐ भूतावासाय नमः ।
सर्व प्राणीमात्रात वास करणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.



९) ॐ भूतभविष्यद्भाव वर्जिताय नमः ।
भूतकाळात होऊन गेलेल्या व भविष्यात होणाऱ्या विषयी मोह सोडलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

१०) ॐ कालातीताय नमः ।
काळाच्या पलीकडे असणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

११) ॐ कालाय नमः ।
काळरूपी साईनाथांना नमस्कार असो.

१२) ॐ कालकालाय नमः ।
काळाचाही काळ असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

१३) ॐ कालदर्पदमनाय नमः ।
काळाच्या दर्पाचे दमन करणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

१४) ॐ मृत्युंजयाय नमः ।
मृत्युला जिंकणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

१५) ॐ अमर्त्याय नमः ।
अमर अशा साईनाथांना नमस्कार असो.

१६) ॐ मर्त्याभयप्रदाय नमः ।
मृत्यू असणाऱ्या जीवांना अभय देणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

१७) ॐ जीवाधाराय नमः ।
जीवांचा आधार असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

१८) ॐ सर्वाधाराय नमः ।
सर्वांचा आधार असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

१९) ॐ भक्तावनसमर्थाय नमः ।
भक्ताचे रक्षण करण्यास समर्थ असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

५९) ॐ त्रिलोकेषु अविघातगतये नमः ।
तिन्ही लोकात ज्यांच्या गतीला अडथळा नाही अशा साईनाथांना नमस्कार असो.

६०) ॐ अशक्यरहिताय नमः ।
काहीही अशक्य नसलेल्या अशा साईनाथांना नमस्कार असो.

६१) ॐ सर्वशक्तिमूर्तये नमः ।
मूर्तीमंत सर्व शक्ती अशा साईनाथांना नमस्कार असो.

६२) ॐ सुरूपसुन्दराय नमः ।
सुरूप व सुंदर अशा साईनाथांना नमस्कार असो.

६३) ॐ सुलोचनाय नमः ।
सुंदर डोळे असणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

६४) ॐ बहुरूपविश्वमूर्तये नमः ।
मूर्तीमंत बहुरूपी विश्व अशा साईनाथांना नमस्कार असो.

६५) ॐ अरूपाव्यक्ताय नमः ।
निराकार व अव्यक्त अशा साईनाथांना नमस्कार असो.

६६) ॐ अचिन्त्याय नमः ।
कल्पनेच्या पलीकडे असणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

६७) ॐ सूक्ष्माय नमः ।
सूक्ष्म अशा साईनाथांना नमस्कार असो.

६८) ॐ सर्वान्तर्यामिणे नमः ।
सर्वांच्या अन्तःकरणात वास करणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

६९) ॐ मनोवागतीताय नमः ।
मन व वाचा यांच्या पलीकडे असणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.



७०) ॐ प्रेममूर्तये नमः ।
मूर्तीमंत प्रेम असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

७१) ॐ सुलभदुर्लभाय नमः ।
प्राप्त होण्यास सुलभ तसेच दुर्लभ अशा साईनाथांना नमस्कार असो.

७२) ॐ असाह्यसहायाय नमः ।
ज्यांना कोणाला सहाय्य करणारे नाहीत त्यांना मदत करणाऱ्या अशा साईनाथांना नमस्कार असो.

७३) ॐ अनाथनाथदीनबंधवे नमः ।
अनाथांचा नाथ व दीनांचा बन्धु अशा साईनाथांना नमस्कार असो.

७४) ॐ सर्वभारभृते नमः ।
भक्तांचा सर्व भार उचलणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

७५) ॐ अकर्मानेककर्मसुकर्मिणे नमः ।
भक्तांची अनेक अकर्म (म्हणजे कर्म करीत असताना सुद्धा जो कर्तेपणाचा अभिमान बाळगीत नाही अशी कर्म) व सुकर्म अशा कर्मरूपी साईनाथांना नमस्कार असो.

७६) ॐ पुण्यश्रवण कीर्तनाय नमः ।
ज्यांचे विषयी श्रवण व कीर्तन पुण्यकारक आहे अशा साईनाथांना नमस्कार असो.

७७) ॐ तीर्थाय नमः ।
जो मूर्तीमंत तीर्थच आहे अशा साईनाथांना नमस्कार असो.

७८) ॐ वासुदेवाय नमः ।
जो साक्षात् वासुदेव आहे अशा साईनाथांना नमस्कार असो.

७९) ॐ सतां गतये नमः ।
सत्पुरुषांची गती असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

८०) ॐ सत्परायणाय नमः ।
सत्पुरुषांचे अंतिम ध्येय असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

८१) ॐ लोकनाथाय नमः ।
सर्व लोकांचा स्वामी असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

८२) ॐ पावनानघाय नमः ।
पवित्र आणि पापरहित अशा साईनाथांना नमस्कार असो.

८३) ॐ अमृतांशवे नमः ।
अमृतासारखी किरणे असलेल्या अशा चंद्ररूपी साईनाथांना नमस्कार असो.

८४) ॐ भास्करप्रभाय नमः ।
सूर्यासारखे तेज असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

८५) ॐ ब्रह्मचर्यतपश्चर्यादिसुव्रताय नमः ।
ब्रह्मचर्य, तपश्चर्या इत्यादी सुव्रतरूपी साईनाथांना नमस्कार असो.

८६) ॐ सत्यधर्मपरायणाय नमः ।
सत्य धर्माच्या ठिकाणी निष्ठा असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

८७) ॐ सिद्धेश्वराय नमः ।
सिद्धांचा ईश्वर असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

८८) ॐ सिद्धसङ्कल्पाय नमः ।
ज्याचे संकल्प नेहमीच सिद्धीस जातात अशा साईनाथांना नमस्कार असो.



८९) ॐ योगेश्वराय नमः ।
योग्यांचा ईश्वर असलेल्या अशा साईनाथांना नमस्कार असो.

९०) ॐ भगवते नमः ।
भगवान साईनाथांना नमस्कार असो.

९१) ॐ भक्तवत्सलाय नमः ।
भक्तांसाठी वात्सल्य असणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

९२) ॐ सत्पुरुषाय नमः ।
सत्पुरुष अशा साईनाथांना नमस्कार असो.

९३) ॐ पुरुषोत्तमाय नमः ।
पुरुषांमध्ये उत्तम अशा साईनाथांना नमस्कार असो.

९४) ॐ सत्यतत्त्वबोधकाय नमः ।
सत्य तत्त्वांचा उपदेश करणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

९५) ॐ कामादिषड्वैरिध्वंसिने नमः ।
काम इत्यादी सहा शत्रूंचा विध्वंस करणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

९६) ॐ अभेदानन्दानुभवप्रदाय नमः ।
परमेश्वराशी ऐक्य साधणाऱ्या, आनंदाचा अनुभव देणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

९७) ॐ समसर्वमतसंमताय नमः ।
सर्व धर्म सम आहेत या तत्त्वाला संमती असणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

९८) ॐ श्री दक्षिणामूर्तये नमः ।
श्री दक्षिणामूर्तीरूपी म्हणजे दक्षिणेकडे तोंड असलेल्या शिवरूपी साईनाथांना नमस्कार असो.

९९) ॐ श्री वेङ्कटेशरमणाय नमः ।
श्री वेङ्कटेश हेच ज्याचे सुख आहे अशा साईनाथांना नमस्कार असो.

१००) ॐ अद्भुतानन्दचर्याय नमः ।
अलौकिक आनंदात वावरणाऱ्या अशा साईनाथांना नमस्कार असो.

१०१) ॐ प्रपन्नार्तिहराय नमः ।
शरण आलेल्याची पीडा हरण करणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

१०२) ॐ संसारसर्वदु:खक्षयकराय नमः ।
संसारातील सर्व दु:खांचा नाश करणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

१०३) ॐ सर्ववित्सर्वतोमुखाय नमः ।
सर्व काही जाणणाऱ्या व सर्वत: दृष्टी असलेल्या साईनाथांना नमस्कार असो.

१०४) ॐ सर्वान्तर्बहि:स्थिताय नमः ।
सर्वांच्या आत व बाहेर असणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

१०५) ॐ सर्वमङ्गलकराय नमः ।
सर्व मंगल करणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

१०६) ॐ सर्वाभीष्टप्रदाय नमः ।
सर्व वांछित वस्तू देणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

१०७) ॐ समरससन्मार्गस्थापनाय नमः ।
ब्रह्माशी तादात्म्य साधण्याचा सन्मार्ग स्थापन करणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो.

१०८) ॐ श्री समर्थसद्गुरूसाईनाथाय नमः ।
श्री समर्थ व सद्गुरू अशा साईनाथांना नमस्कार असो.



# नामस्मरणाचे महत्त्व

- ❖ प्रारब्धाची तीव्रता कमी होते.
- ❖ प्रारब्ध भोगण्याची क्षमता वाढते.
- ❖ सांसारिक अडचणी कमी होतात.
- ❖ परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता वाढते.
- ❖ समाधान मिळते.
- ❖ वास्तू शुद्धी होते.
- ❖ घरात शांति येते.
- ❖ घरातील सात्त्विकता वाढते.
- ❖ प्रेमभाव निर्माण होतो.
- ❖ घरात भगवंताचा वास राहतो.
- ❖ संकटाला सामोरे जाता येते.
- ❖ काळजी मिटते, भिती जाते.
- ❖ स्वभावात बदल होतो.
- ❖ आपल्या गरजा कमी होतात.
- ❖ भगवंताला भेटता येते.

# अहंभाव कसा कमी करावा ?

- दिवसभरात माझ्या बोलण्यात 'मी' 'माझे' 'मला' हे कमी करणे.
- प्रत्येक कृतीचे कर्तेपण ईश्वराला अर्पण केल्यास आपला अहं कमी होतो.
- मी केले म्हणून झाले असा विचार नको.
- फळाची अपेक्षा न करता कृती केल्यास आपला अहं कमी होतो.
- आपली श्रद्धा वाढली की अहं आपोआप कमी होतो.
- आपली ऐकण्याची वृत्ती वाढवली की अहं कमी होतो.
- दुसऱ्याला शिकवण्यापेक्षा दुसऱ्याकडून शिकत रहावे.
- मला काही कळत नाही अशी स्थिती राहिली तर अहं कमी होतो.
- आपण दुसऱ्यामधील गुणांकडे बघावे म्हणजे अहं कमी होतो.
- माझ्या मनात अहं नाही असा विचारही सूक्ष्म अहं निर्माण करतो.
- दुसऱ्याची सेवा करून आपला अहं कमी होईल.
- अर्पण करणे, कृतज्ञता व्यक्त करणे, प्रार्थना करणे याने अहं कमी होतो.
- कायिक, वाचिक, मानसिक स्वार्थ कमी केल्यास अहं कमी होतो.
- देहबुद्धी कमी केली की अहं कमी होतो.
- आपल्यातील विकार कमी झाले की अहं कमी होतो.
- प्रतिक्रीया न देणे, मध्येच न बोलणे, तक्रारी न करणे याने अहं कमी होतो.
- विश्वाच्या व्याप्तीशी आपण आपली तुलना केल्यास अहं कमी होतो.